मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखप

# हितगुज



TOURWAYS आयोजित
विविध सहली

अंबाजोगाई
सोबत परळी वैजनाथ
सोमवार ते शनिवार दररोज

साडेतीन शक्तिपीठे
सप्तशृंगी-वणी,रेणुका-माहुर,
भवानी-तुळजापूर,महालक्ष्मी-कोल्हापूर
श्रावण महिन्यात १९ ते २२ ऑगस्ट

अंदमान
२१सप्टें,२६ ऑक्टो,८नोव्हें

कोस्टल कर्नाटका
९/२३ जुलै,१३/२७ ऑगस्ट,
१७ सप्टेंबर

कुर्ग- मडिकेरी
आपल्या सोयीनुसार

वायनाड
आपल्या सोयीनुसार

शिलाँग-चेरापुंजी
१ ते ८ ऑक्टोबर

मालदिवज्
आपल्या सोयीनुसार

संपर्कः राजेश रानडे - 022 65281 281 / 92232 73496

C – 305 – PALM ACRES, M.PHULE ROAD, MULUND (E) MUMBAI 400 081

# माझी पंढरीची वारी

- साधना वसंत मराठे (पृ.३६९ )

ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरीतील एकतरी ओवी अनुभवावी, तशीच एकतरी पंढरीची पायी वारी अनुभवावी असे वाटते.

पंढरीच्या वारीचा अनुभव लिहिणे म्हणजे आकाशाला गवसणी घालणे जसे व्यर्थ आहे, तसेच वारीचे वर्णन शब्दात करणे खरोखरीच अशक्य आहे.

ज्येष्ठ कृष्ण नवमीच्या दिवशी श्री ज्ञानेश्वर माउलींच्या देवळाचा कळस हलला की पंढरीची वारी सुरू होते. देवळाचा कळस हलताना दिसणे हे प्रत्येकाच्या भाग्यात असतेच असे नाही. परंतु माऊलींनी तिथे संजीवन समाधी घेतली आहे, त्या देवळाचा कळस हलणे ही कपोलकल्पित गोष्ट निश्चितच नाही. ज्ञानदेवांच्या आयुष्यातला खरा चमत्कार म्हणजे समाजातील अठरा पगड जातींना त्यांनी 'जय जय रामकृष्ण हरी' या मंत्र-सूत्रात एकत्र गुंफले आहे. लहानपणी माऊली, निवृत्तीनाथ, सोपन, मुक्ताई ह्या चारही भावंडांनी तत्कालिन समाजाकडून वाळीत टाकण्यापासून ते कोरान्न भिक्षा मागतानाही अनन्वित छळ सोसला आहे. त्याच समाजासाठी गीतेसारख्या कठीण वेदाचे ज्ञान ज्ञानेश्वरीच्या रूपाने जनसामान्यांपर्यंत पोहचावे म्हणून आई जशी आपल्या बाळाला अन्न मऊ करून त्याला पचेल असे भरवते, तसेच ज्ञानदेवांनी आपल्या गुरू आशीर्वादाने गीताज्ञान सोपे करू भरवले आहे म्हणूनच ज्ञानदेवांना माऊली म्हणून संबोधतात. या चारही भावंडांचा जन्मक्रम तरी किती आध्यात्मिक. प्रथम संसारापासून मनाने निवृत्त व्हा - निवृत्तीनाथ, मग ज्ञान मिळवा - ज्ञानेश्वर माऊली, ज्ञानाचे एकेक सोपान वर चढा - सोपानदेव व शेवटी मुक्ती मिळवा - मुक्ताबाई. हे संकेत किती अलौकिक आहेत.

वारीला जाताना प्रत्येक वारकरी एकमेकांना माऊली म्हणूनच साद देत असतो. प्रत्येकात माऊलीचा साक्षात्कार जणू काही प्रत्येक वारकरी अनुभवत असतो. माऊलीचा पहिला मुक्काम सासवड येथे असतो. सासवडला सोपान देवांचं समाधी मंदिर आहे. सासवडला जाताना वाटेत दिवेघाट लागतो आणि तिथे वैशिष्ट्य असे, की जेव्हापासून पंढरीची वारी परंपरा सुरू झाली तेव्हापासून या घाटात पाऊस पडतोच याचे कारण विठुरायाचे नामस्मरण करीत सर्व वारकरी लाखोंच्या संख्येने एकमुखाने टाळ-मृदुंगाच्या गजरात मार्गक्रमण करतात. माऊलींच्या पालखीला दिवेघाटात सहा बैलजोड्या जोडतात म्हणजे मुके प्राणीदेखील वारीत सामील असतात. माऊलींचे दोन घोडे असतात. या वारी करणाऱ्या मुक्या प्राण्यांचे किती भाग्य की माऊलींच्या संजीवन पादुकांची पालखी ओढणे आणि पंढरपूरापर्यंत वारकऱ्यांसमवेत जाणे. कळतनकळत हा पुण्याचा



साठाा पुढील सात जन्मापर्यंत पुरावा असे त्यांचे भाग्य. हा सगळा सोहळा स्वर्गातून देव पाहत असतात आणि त्यांच्या डोळ्यातील आनंदाश्रू धरणीवर पावसाच्या रूपाने वारकऱ्यांना स्नान घालीत असतात. किती ही भक्तीभावाची ओढ असलेल्यांवर देवाची कृपा! खरंच, या भक्तीरसाबरोबर आपण कसे वाहत जातो हे आपल्यालाच कळत नाही.

खरं तर वारकरी संप्रदायच भक्तीरसाचा एक अभूतपूर्व प्रवाह आहे. कारण प्रत्येक दिंडीतील वारकरी टाळ वाजवून, हातात भगवी पताका, वीणा घेऊन आणि गळयात पखवाज घेऊन वाजवत व मुखाने संतरचित अभंग, हरीपाठ व नामगजर करीत मार्गक्रमण करीत असतात. आणि अभंग तरी किती सुरेल आवाजात, तालात आणि नाचत म्हणत असतात. मध्येच नाचणे ह्यामागेसुद्धा शास्त्र आहे. थोड्या उड्या मारणे, गिरकी घेणे, नाचणे असे केल्याने थकलेल्या पायांना जरा वेगळी दिशा मिळून थकवा नाहीसा होतो. याचा मी स्वत: अनुभव घेतला आहे. अशा सोहळ्याचे वर्णन शब्दातीत आहे. आज सातशे ते आठशे वर्षांपासून ही सांप्रदायिक वारकरी परंपरा केवळ माऊलींच्या कृपेनेच संपन्न होत आहे यात शंका नाही.

आमच्या दिंडीचे संचालक ह.भ.प. विद्या-वाचस्पती श्री. रामचंद्र देखणे महाराज होते. वारीत एकूण १५० ते २०० लहान-मोठ्या दिंड्या असतात. माऊलींच्या पालखीच्या मागे व पुढे असा दिंड्यांचा क्रम असतो. आमची दिंडी पालखीच्या मागे चौथ्या क्रमांकावर होती. दिंडीचे संचालन अतिशय उत्तम होते. रोज सकाळी ६.१५ वाजता चालायला सुरुवात करायची. दिंडीबरोबर एक सामानाचा टेम्पो, स्वयंपाकाच्या साहित्याचा ट्रक, पाण्याचा टँकर व एक रिक्षा असा लवाजमा असे. रिक्षा ठेवण्याचे कारण म्हणजे कुणाला उशीर झाला किंवा काही त्रास झाला तर त्याला मुक्कामाच्या ठिकाणी घेऊन येण्यासाठीची योजना होती. सकाळी प्रत्येकजण, आपापल्या सोयीनुसार उठून प्रार्तर्विधी व स्नान करून तयार व्हायचे. ६.००वाजता चहा-नाश्ता तयार असे, बरोबर पोळी-भाजीचे पॅकेट दिले जायचे. 'जय जय रामकृष्ण हरी'च्या गजरात मार्गक्रमण सुरू व्हायचे. प्रत्येक मुक्काम २२ ते २५ कि.मी. अंतरावर असायचा. सायंकाळी मुक्कामाच्या ठिकाणी गेल्यावर चहा व्हायचा, मग हरीपाठ, पंचपदी, महाराजांचा अथवा त्यांनी आयोजन केलेल्या एखाद्या विद्वान व्यक्तीचा सत्संग, भजन अथवा कीर्तन असे. ते झाल्यावर भोजन व नंतर विश्राम असा दिनक्रम असे. एक दिवस तर श्री.ह.भ.प.देखणे महाराजांच्या २२

वर्षाच्या मुलाने ज्ञानेश्वरीवरील भक्ती या विषयावर एक तास अप्रतिम प्रवचन केले. ते ऐकून तर मला गुरू-शिष्याचा अलौकिक अनुभव आला. आपल्याबरोबर आपल्या मुलालादेखील सांप्रदायिक वारीत सत्संग करण्याचे शिक्षण महाराजांनी दिले होते व त्याने ते आत्मसात करून लोकांपुढे सुसूत्र बांधून वक्तृत्वकला सादर केली याचे मला कौतुक वाटले.

जवळजवळ १५-२० कि.मी. अंतरापर्यंत वारकऱ्यांच्या संख्येने सारा रस्ता फुललेला असायचा. ज्या वेळी चढण यायची त्या वेळी भगवे झेंडे, पांढऱ्या टोप्या आणि नामगजराचा आवाज करत करत समुदाय वरवर चढत असताना दिसायचा.

चार ठिकाणी माऊलींच्या घोड्यांचे रिंगण असते. त्यात एक उभे रिंगण चांदोबाचा लिंब येथे असते. एक कि.मी. अंतर रस्ता धावून घोडे परत माघारी माऊलींच्या पालखीजवळ येतात अशा पाच फेऱ्या घोडे मारतात व पालखीला वंदन करून पुन्हा मार्गक्रमण करायला सुरुवात होते.

सदाशिवनगरचे रिंगण तर अप्रतिम असते. एक कि.मी. अंतराचे गोल रिंगण असते. माऊलींच्या पालखीच्या अगोदर सर्व दिंड्या रिंगण फिरून पूर्ण करतात. नंतर माऊलींच्या घोड्यांना घोडेस्वार रिंगण कसे फिरायचे त्याची एक चक्कर फिरवून आणतात. आणि रिंगणाला सुरुवात झाल्यावर तर अवघ्या २५ सेकंदात कळ दाबताच एखादे यंत्र जसे फिरते तशा प्रचंड वेगाने घोडेस्वाराचा घोडा व त्याच्या मागून एकटा घोडा (ह्या घोड्यावर स्वत: माऊली असतात अशी सगळ्यांची धारणा असते.) असे धावत असतात. अवघ्या पाच मिनिटात दोन्ही घोडे रिंगणाच्या पाच फेऱ्या पूर्ण करतात. रिंगणाचा हा सोहळा पाहून वारीचे सार्थक झाल्यासारखे वाटते. दूरदर्शनवर तर आपण पाहतोच, पण प्रत्यक्ष सोहळा पाहताना अंगावर शहारे आणि डोळ्यांत पाणी आल्याशिवाय राहत नाही. अशा तऱ्हेने एक-एक मुक्काम कधी पार पडत होता ते कळलेच नाही. आणि जेव्हा शेवटच्या दिवशी पंढरपूर फक्त १४ कि.मी. अंतरावर पाहिल्यावर मला विठ्ठलभेटीची ओढ लागली. केव्हा विठ्ठलाचे रूप डोळ्यांना दिसते असे झाले. वारीत असताना एक वैशिष्ट्यपूर्ण मातृभक्ती पाहायला मिळाली. एक वारकरी आपल्या आईला खांद्यावर घेऊन वारी करत होता. श्रावणबाळाचे व पुंडलिकाचे मातृ-पितृप्रेम आजतागायत आहे याचा प्रत्यय येऊन आईला खांद्यावर नेणाऱ्या पुत्राचे सर्वचजण चरणस्पर्श करून त्याच्यापुढे नतमस्तक होत होते.

पंढरपूरच्या भूमीत पहिले पाऊल टाकल्यावर हृदयात वारीपूर्तता झाल्याने आनंदाच्या उर्मी आणि पांडुरंगाचे दर्शन होणार ह्या ओढीने डोळ्यांत आनंदाश्रू दाटले. लगेचच मुखदर्शनाच्या ओळीत उभे राहून लाडक्या श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले. आणि जीवनाचे सार्थक झाल्याचा अनुभव आला. मुक्कामाच्या ठिकाणी येताना ज्या रिक्षात बसलो होतो, त्या रिक्षावाल्याने आमचे बोलणे ऐकले की मुखदर्शन झाले, पण चरणस्पर्श कसा होणार? तो म्हणाला की तुम्हाला खरंच पांडुरंगाच्या पायावर डोके ठेवायची इच्छा असेल तर मी तुम्हाला सर्वांना पहाटे ३.३०ला घ्यायला येईन. तुम्ही सर्वजण तयार राहा. आमचा त्याच्या बोलण्यावर विश्वासच बसेना. आम्ही एकमेंकीकडे आश्चर्याने बघायला लागलो, की खरंच पांडुरंगाने ह्याला पाठविले की काय? मनात उत्कट आणि प्रबळ इच्छा असेल, तर मार्ग मिळतोच याचे प्रत्यंतर आले. आम्ही लगेच त्याला होकार दिला. ठरल्याप्रमाणे तो पहाटे ३.३०ला मुक्कामाच्या ठिकाणी हजर होता. आम्हीपण तयार होतोच. देवळात बसून देवाची काकड आरती, पूजा व पुन्हा आरती घेऊन ६.१५ वाजता लोण्याचा प्रसाद व चंदन घेऊन बाहेर पडलो. पांडुरंगाची लीला अगाध आहे.

अशी ही पंढरीची वारी, दर्शन व वारकऱ्यांचा १५ दिवसांचा सहवास चिरस्मरणात राहील. पुन्हा पांडुरंगाचे बोलावणे यावे हीच इच्छा!

हृदयात नर्मदा परिक्रमेचा दुधाचा पाझर आणि त्यात पंढरीच्या वारीची साखर असा दुग्धशर्करा प्रवाह अजूनही वाहतोच आहे. त्यातून बाहेर पडणे शक्य नाही. प्रत्येक क्षण स्मरणात आहे, आठवतो आहे. कारण नुकतीच फेब्रुवारी २००९ला नर्मदा परिक्रमा पूर्ण केली आणि जून १७ ला पंढरीच्या वारीला निघाले. परिक्रमेच्या भानातून मी अजून बाहेर पडले नाही, त्यातच रमत होते आणि पंढरीच्या वारीची त्यात भर पडली आहे. असा सुरेख संगम आयुष्याच्या अंतापर्यंत हृदयात पाझरतच राहो अशी नर्मदामैय्या व विठू माऊलींच्या चरणी नम्र प्रार्थना करते.

''जय जय रामकृष्ण हरी।।''

**- साधना वसंत मराठे, (पृ. ३६९)**
'वसंत', पाटीला कॉलनी, लेन नं.३
एच.पी.टी.कॉलेज रोड, नाशिक - ४२२ ००५
फोन नं. : ०२५३-२३१०७०१

## ।।वारकरी।।

*आम्ही वारकरी वारकरी, जातो क्षेत्री पंढरपुरी ।*
*विठुरायाच्या दर्शनाला, आतुरतो वारकरी ।*
*टाळ गजराच्या संगे, विसरतो देहभान ।*
*माऊली तुकयाच्या नादि, त्यात होतो रममाण ।*
*वेध लागती वारीचे, ज्येष्ठापासून, हो आम्हा ।*
*मन धावते वाऱ्यावर, आरंभ वारीचा होतो केव्हा ।*
*थोर लहान मिळती, नसे कुठे भेदाभेद ।*
*हरिगजराच्या नामे, घुमतसे एकची नाद ।*
*मनी ये तसे हो नेहमी, पाउले चालती पंढरीची वाट ।*
*परी साथ नसे कोणाची, कशी जाऊ मी वारीत ।*
*दूरदर्शनाच्या योगे, दृश्य लाभते वारीचे ।*
*पाहुनिया तो सोहळा, होते समाधान मनाचे ।*
*विठोबाचे घेता नाम, दूर जाई हो ते पाप ।*
*जोडोनिया दोन्ही कर, करितसे प्रणिपात ।*

**- सौ. सुहासिनी नारायण मराठे (पृ.१८)**
मराठे वाडा, पारनाका, कल्याण फोन नं. : ०२५१-२०८४६४

# गुजरातमधील महाराष्ट्रीय संत

**श्री. सदाशिव बळवंत मराठे, बडोदे, (पृ. क्र. ३८०)**

अनादी काळापासून समग्र भारतवर्षातील अनेक प्रांतातून त्या त्या प्रदेशात लहान-मोठे संत भक्तांना मार्गदर्शन देण्यास पुढे आले व भक्तांनीही संतांचे विचार शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी संस्थांमार्फत अगर व्यक्तिश: प्रयत्न केले - करत आहेत. महाराष्ट्राच्या बाहेर मराठी भाषिक संतही प्रसिद्धीस आले. त्याची उदाहरणेही मिळतात. तशाच दोन संतांची ही कथा.

गुजरातमधील प्रजेला दत्तभक्तीचे वेड लावणारे मराठी भाषिक; परंतु पूर्ण गुजराती झालेले संत म्हणजे रंग अवधूत महाराज. मूळ नाव श्री. पांडुरंग वाळीमे व दुसरे संत श्री. रामचंद्र डोंगरे महाराज.

पू. रंग अवधूतांचा जन्म गोधऱ्याचा. २१-११-१८९८चा. बालपणापासून दत्तभक्तीत रस होता. स्वत:च्या दैवी शक्तीवर संपूर्ण श्रद्धा होती. शिक्षणांत अग्रेसर असलेल्या पांडुरंगाने संस्कृत व इंग्रजी विषयात प्रभुत्व मिळवले. अहमदाबादच्या शाळेत शिक्षकाची नोकरी केली. त्यांचे ''गीर्वाण भाषा प्रवेश'' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. दत्तपुराण ग्रंथ वाचल्यावर परिणामस्वरूप शिक्षकाची नोकरी सोडली. हिंदी भाषेत ''दत्ताष्टक'' व संस्कृतमध्ये ''दत्तशरणाष्टकम्''ची रचना केली. जीवनाच्या शेवटच्या काही वर्षात नर्मदाकिनारी नारेश्वर मुक्कामी कडुलिंबाच्या झाडाखाली मुक्काम केला. ह्या वृक्षास 'बोधिवृक्ष' असे नामभिधान झाले. त्यांचा शेवटचा ग्रंथ ''गुरूलीलामृत'' तर महाकाव्य ठरला. वृद्धत्वाचे क्लेश अनुभवताच त्यांनी नारेश्वरच्या आश्रमातून हरिद्वारला प्रयाण केले. नारेश्वर सोडताना त्यांचे अंतिम उद्‌गार होते, ''मी हरिच्या द्वारी जात आहे.'' ''श्वासे श्वासे स्मरान्मन दत्तनाम'' असे म्हणत तेथेच देहत्याग केला. आज गुजरातमध्ये अनेक ठिकाणी रंग अवधूत भक्तमंडळे पाहण्यास मिळतात व मंडळांमार्फत अवधूतविचारांचा प्रचार-प्रसार होत असतो. गुजराती भाषेमधील दत्तबावनी तर घराघरात ऐकावयास मिळते. आजतागायत नारेश्वर मुक्कामी भक्तजनांचा ओघ सतत चालू असतो. आश्रमात सर्व भक्तांना आमटी-भात-शिऱ्याचा जेवणवजा प्रसाद रोज दुपारी १२वाजता देण्यात येतो. स्वच्छ, सुरम्य व भक्तिभावाने भरलेले हे नर्मदाकिनारीचे स्थान येणाऱ्या प्रत्येकाला खूप दिलासा देते. मन:शांती लाभते.

पू. डोंगरे महाराजांचा जन्म बडोदे मुक्कामी दिनांक १५-२-१९२६ रोजी झाला. वयाच्या आठव्या वर्षीच ते अभ्यासासाठी पंढरपुरास गेले. तेथे सात वर्ष पुराण, शास्त्र, वेदांताचे गहन अध्ययनाने जीवनात ज्ञान, भक्ती आणि वैराग्य यांचा त्रिवेणी संगम साधला. बडोद्याचे नरहरी महाराज ह्यांचे शिष्यत्व करून प्रथम मराठीत भागवत सप्ताह केला. त्यानंतर मात्र गुजराती भाषेत गुजरात व गुजरातचे बाहेर असंख्य भागवतसप्ताह केले. भागवताचे विरूपण करताना त्यांची दृष्टी सतत कृष्णमूर्तीवर स्थिर असे. कृष्णाचे वर्णन कथन करताना ते इतके भावविवश होत असत, की त्यांच्या नेत्रातून अश्रू वाहत असत. त्यांची दृष्टी श्रोत्यांकडे कधीच नसे. श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत असत. भागवत सप्ताहात मिळालेली रक्कम, वस्तू ते मंदिर, दवाखाने, शिक्षणसंस्था ह्यांना अर्पण करीत असत. बडोद्याचे महाराजा सयाजीराव युनिर्व्हसिटी आर्थिक संकटात सापडली, तेव्हा त्यांनी खास भागवतकथा सप्ताह करून मिळालेली खूप मोठी रक्कम युनिर्व्हसिटीला अर्पण केली होती. त्यांची वाणी मधुर व प्रेरक असे. त्याची वाक्‌शैली मंत्रमुग्ध करत असे. गुजरातेत त्यांचे असंख्य भक्त आहेत. त्यांनी सुरू केलेल्या काही धर्मशाळा आजतागायत कार्य करीत आहेत. अंतिम दिवसात कॅन्सरच्या आजाराने त्यांना भागवत कथन बंद करावयाचा सल्ला डॉक्टरांनी दिल्याने नडियादच्या संतराम मंदिरात त्यांनी संन्यास धारण केला व तेथेच देह ठेवला. भक्तजन खूपच निराधार झाल्यासारखे झाले. अर्वाचीन युगाच्या शुकदेवाने प्रयाण केल्याने भक्तांच्या डोळ्यांतील अश्रू आवरणे कठीण झाले. नर्मदाकिनारी मालसर ह्या क्षेत्री त्यांना वाहत्या जलौघात जलसमाधी देण्यात आली. आजही मालसर मुक्कामी सतत भगवतभजन, अन्नदान वगैरे चालू आहे. त्यांचा ''श्रीकृष्ण शरमं मम'' हा जप अनेक भक्त सातत्याने करतात.

**- सदाशिव बळवंत मराठे (पृ. ३८०)**
मराठे वाडा, शास्त्री लेन, 'अन्नपूर्णा' कोठी चार रस्ता,
वडोदरा (गुजरात) ३९० ००१
फोन नं. २४२३०५५/ २४२८६१८

### नांदा सौख्यभरे

साप्ताहिक किरातचे संपादक श्री. श्रीधर केशव मराठे, (पृ.३९६) वेंगुर्ले आणि सौ. शुभदा श्रीधर मराठे यांचे सुपुत्र ॲडव्होकेट चि. शशांक यांचा शुभविवाह चि.सौ.कां. सीमा भवानीशंकर पाध्ये, कुडाळ हीजबरोबर थाटामाटात संपन्न झाला. शुक्रवार दिनांक ११ डिसेंबर २००९ला श्रीसत्यनारायणाची पूजा व स्वागत समारंभ भटवाडी, वेंगुर्ले येथील त्यांच्या निवासस्थानी आयोजित केला होता. 'सा. किरात' मध्ये सौ. सीमा या लेखन करीत असतात.

विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या आनंदसोहळ्यात सहभागी झाल्या होत्या.

नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक शुभेच्छा!

# बस तेरा साथ

**गजानन भास्कर मराठे-सौ. रोहिणी गजानन मराठे**

'मुंबई टाइम्स सेलिब्रिटिंग व्हॅलेण्टाइन' ने 'जब वी मेट' ही स्पर्धा आयोजित केली होती. तिला हजारो वाचकांनी तुफान प्रतिसाद दिला. आपले कुलबांधव श्री.ग.भा.मराठे यांनीही आपल्या पहिल्या भेटीच्या आठवणींची कुपी 'मुंबई टाइम्स'कडे उघडली. ती आठवण खास 'हितगुज'च्या वाचकांसाठी प्रकाशित करीत आहे.

-संपादिका

दिवस पावसाचे होते. रेल्वे, वाहतूक विस्कळीत झाली होती. मी बसच्या रांगेत तासभर उभा होतो. माझ्यामागे एक तरुणी हातात लायब्ररीचं पुस्तक घेऊन उभी होती आणि पुटपुटत होती, की कोणत्या मुहूर्तावर लायब्ररीत आली म्हणून. तेवढ्यात एक बस आली. दहा जण उतरले आणि कंडक्टरने तेवढ्याच म्हणजे दहा जणांनाच आत घेतलं. मी त्या दहात होतो. आणि बस सुरू झाली. तेवढ्यात मी पटकन बोलून गेलो, ''साथ में है'' हे ऐकून कंडक्टरने बस थांबवली आणि त्या तरुणीलाही आत घेतलं.

मी तिला विचारून तिच तिकीट काढलं, कारण आम्ही 'साथ में' होता ना! थोड्या वेळाने आम्हाला जवळजवळ जागा मिळाली. मग, पुढचा तास-सव्वा तास आम्ही गप्पा मारल. ती नेहमी त्या लायब्ररीत येत असे. नंतर मीही तीच लायब्ररी जॉईन केली. आमच्या अधूनमधून भेटी होऊ लागल्या. साहित्याची आवड हा समान दुवा असल्यामुळे गप्पा रंगत असत. दोन-तीन महिने गेले. मला वाटलं, ती 'प्रेयसी' म्हणून मला प्रतिसाद देईल.

मी कल्पना लढवली, आणि मी काढलेल्या 'त्या' दोन तिकिटांचा प्रेमपत्र लिहिण्यासाठी उपयोग केला. एका तिकिटावर 'खरोखर जीवनसाथी होणार का?' असं लिहिलं आणि उत्तरासाठी दुसरं तिकीट जोडलं. 'पहिले प्रेम' ही कादंबरी घेऊन त्यात ती दोन तिकिटं ठेवली आणि ते पुस्तक तिला दिलं. तिला वाटलं ती तिकिटं म्हणजे पुस्तकात बुकमार्क म्हणून ठेवली आहेत, म्हणून तेव्हा तिने माझी भावना वाचलीच नाही. पण, घरी गेल्यावर ते वाचल्यावर त्या तिकीटाच्या मागे 'जन्मोजन्मी' असं लिहून माझ्या प्रेमाला प्रतिसाद दिला. चार दिवसांनी मला पुस्तक दिल्यानंतर तिचा प्रतिसाद मला कळला. मग, आमचं शुभमंगल झालं.

ही घटना मी २० आणि ती १६ वर्षांची असताना घडलेली. आता आमच्या वैवाहिक जीवनाला ६०वर्षं झालीत. लग्नाच्या वाढदिवशी ती तिकिटं काढून त्या जुन्या आठवणींना आम्ही आजही उजाळा देतो.

**- श्री. ग.भा.मराठे (पू.क्र. ४२७)**
सी-४/२, कॅशुरीन सोसायटी, बस डेपोजवळ,
घाटकोपर-पूर्व. मुंबई ४०० ०७५
फोन नं. :०२२-२५१६३९०७
मोबाईल नं. : ९८६९८७५२२५

## * चित्पावनी म्हण्यो *

* वऱ्हाडोचा खर्च मांडवाला
* काखेत घोडा = न होणारा, असंभव
* वटवाघुळाला अंघोळ घालणे - विषयाला वेगळेच वळण देणे.
* हसणाऱ्या बाईचा आणि रडणाऱ्या पुरुषाचा विश्वास करू नये
* पिकलेलं पान पडता हिर्वे पान हसले म्हणे
* पितांबर पोतेर्याला, सोवळ्यो चड्डी तातरल्या
* हनुमंताची शेप - न संपणारा

## सहवेदना

आपले कुलबांधव श्री. विश्वनाथ विष्णू जोशी, नागपूर यांचे दिनांक १३-५-२०१० ला दु:खद निधन झाले. मराठे प्रतिष्ठानद्वारा त्यांना हार्दिक श्रद्धांजली. ईश्वर त्यांना सद्‌गती देवो ही प्रार्थना.

# गंगेचे मनोगत

**इंदिरा अनंत मराठे, वेळगे-पाळी-गोवा**

शुभ्रधवल हिमालयाच्या कुशीत माझा जन्म झाला. थंडगार वातावरणात स्वच्छ, सुंदर, निर्मळ असे रूप मला लाभले. त्यामुळे मी अतिशय शीतल. भगवान शंकराने विषाचा दाह शांत होण्यासाठी मला आपल्या जटेत धारण केले. अशी मी बालपणीच बंदिस्त झाले.

कालांतराने एक दिवस काय झाले कोणास ठाऊक, मी खाली आले. नंतर समजले, की भगिरथ या ऋषीने फार मोठी तपश्चया करून आपल्या पितरांच्या उद्धारासाठी महादेवाकडे माझी मागणी केली म्हणूनच भागीरथी-गंगा या नावाने माझी जटेतून थोडीशी मुक्तता केली, मी खाली आले. मला खूप आनंद झाला, कारण मी इकडे-तिकडे बागडत पुढे जात होते. पण मोठमोठ्या खडकांना आपटत होते. दुखापत होत असूनही मला ते आवडत होते, कारण बांधलेले वासरू सोडले की जसे उड्या मारत धावते आणि कोणालाही आवरत नाही अगदी तसेच माझे झाले होते.

असे फिरता फिरता उंच शिखरावरून हळूहळू पुढे सरकत एकदम कड्यावरून खाली कोसळले, तिथे सावरणारे, धरणारे कुणीही नव्हते. एकदम उंचावरून खाली आपटत होते. तिथे फेस निर्माण होत होता, जशी काही चैतन्याने सळसळत होते. वरून पडताना धो धो असा आवाज होत होता. एकदम वरून पडताना प्रवाहाला प्रचंड गती होती, म्हणून तिथे मला धबधबा असे संबोधू लागले. माझे ते मनोहारी, रमणीय रूप पाहायला लांबलांबून लोकं येऊन आपल्या नजरेत साठवायचा प्रयत्न करत होते. तिथे मला यातना होत असल्या तरी मी प्रसन्न होते. नंतर हळूहळू पुढे सरकत माळावर आले असता, तिथे मला लहान-मोठे ओढे, नाले, असे पाण्याचे प्रवाह येऊन मिळाले. माझ्यावर मोठमोठे पूल बांधले गेले, तसेच आता माझा विस्तार वाढला होता. माझ्या पाण्याचा सर्वत्र उपयोग होत होता. त्या माझ्या पाण्यावर लहान-मोठ्या होड्यांचा वापर करून सामानाची व माणसांची ये-जा अशी वर्दळ सुरू झाली होती. तसेच आजूबाजूचे ओढे, छोट्या नद्या मिळाल्याने माझ्यात लहान-मोठे मासे, मगरी असे जलचर आश्रयाला आले. ते सर्व निमूटपणे सोसणे माझ्या नशिबी आले. छोटी-मोठी धरणे बांधून शेतीला पाणी वापरण्यात आले. शेती भरपूक पिकून सर्वत्र सुबत्ता आली. असेच चालले असता दक्षिणेत दुष्काळ पडला. सर्वत्र हाहाकार माजला. गंगेचा एवढा मोठा प्रवाह असून पाण्याचे दुर्भिक्ष म्हणून पुन्हा एकदा गौतम ऋषीने मोठी तपश्चर्या केली व देवांचा देव महादेवाकडे पुन्हा एकदा माझी मागणी केली. पुन्हा मला आज्ञा झाली, माझा एक प्रवाह दुसरीकडे सुरू झाला. तिथे मी गौतमी-गंगा म्हणून प्रसिद्ध झाले.

नाशिक येथष कुशस्थळीत माझे पुन:आगमन झाले. कुशाने म्हणजे दर्भाने निर्माण झाले म्हणून कुशस्थळ. गौतमाच्या प्रार्थनेने म्हणून गौतमीगंगा, भगवार शंकर तिथे प्रसन्न झाले म्हणून त्र्यंबकेश्वर नावाने तिथे त्यांनी वास्तव्य केले. आणि तो भाग सर्वत्र सुपीक झाला. देवाच्या वास्तव्याने पवित्र झाले व प्रसिद्ध क्षेत्र झाले.

काशी क्षेत्री मी मंदाकिनी नावाने नावारूपाला आले. तिथे महादेवानी मला अंतर दिले नाही. माझ्याबरोबर तिथेही विश्वेश्वर या नावाने वास्तव्य केले. आणि भगीरथानी आणली, तिथे हरिद्वार, ऋषीकेश येथे बद्रीकेदार किंवा बद्रीनाथ असे माझ्यासह राहिले. त्यामुळे मी धन्य झाले. माझे जीवन सार्थकी लागले. हळूहळू माझा प्रवाह कमर होत गेला. जसे काही मला वार्धक्य येऊ लागल्यासारखे वाटू लागले. कारण पुढे सर्व वाळवंट होते. कोठेच सावली नाही, गारवा नाही माझ्या अंगाची शीतलता आहे म्हणून कसेतरी चालले आहे. उन्हाचा दाह सहन होत नव्हता, पण मला थांबायचे माहीतच नाही. फक्त जात राहायचे, चालायचे एवढेच माहीत. चालत आहे म्हणून मला जीवन म्हणतात. मी चालते तशी दुसऱ्यालाही चालविते, माझ्याशिवाय कोणाचेच चालणार नाही. मी रसपूर्ण आहे. तसेच दुसऱ्यास रसपूर्ण करते म्हणून सर्व वनस्पती, प्राणी, जीव-जंतू तग धरून आहेत. माझ्या अभावाने सर्व सृष्टी नष्ट होऊन जाईल. हे चालू राहण्यासाठी मला पुढे गेलेच पाहिजे. थांबून चालणार नाही. जाऊन समुद्राची भेट घेतलीच पाहिजे, कारण माझे पुढील रूप बाष्प आहे. समुद्राच्या ठिकाणी ते मोठ्या प्रमाणावर होणार आहे हे मी जाणून आहे. नंतर बाष्पाचे पाण्यात रूपांतर होईल, व पुन्हा पाणी दऱ्या-खोऱ्यातून, नद्यानाल्यांतून असे हे जलचक्र चालते. तेव्हा मला न थांबता पुढे गेलेच पाहिजे. आता एकच ध्यास समुद्राशी मीलन होऊन त्यात समरस होणे. पण एवढे असूनही तीर्थक्षेत्री पापक्षालनासाठी माझा वापर करतात, तेव्हा मला मलिनता प्राप्त होते. शारीरिक तशी मानसिकही.

काशीक्षेत्री मरण आल्यावर मुक्ती मिळते ह्या भावनेने अर्धवट जळलेली शव तशीच प्रवाहात टाकली जातात. आधुनिक भारतात तर वाढत्या लोकसंख्येने कहरच केला आहे. अजूनही लोकसंख्या वाढतच आहे. अनेक लोकांची शवं जेव्हा पाण्यात पडतात, तेव्हा कुजून मला मलिनता येते. मी अपवित्र होते. मला पवित्र कोण व कसे करणार? असा प्रश्न पडतो. मला ज्ञानगंगा असेही दुसरे नाव आहे. ते श्रेष्ठ आहे. तेव्हा तशा ज्ञानगंगेच्या तीरावर साधना करून पापक्षालन केले, तर मीही स्वच्छ राहीन व मानवाचे पापक्षालन होईल. मी पवित्र राहीन असे घडावे ही माझी मनोमन इच्छा आहे. पण हे केव्हा घडेल? न पेक्षा मी पूर्वी होते तिथेच खूप सुखी होते.

**- इंदिरा अनंत मराठे,**
वेळगे-पाळी, गोवा

**मतभेद अनेकदा विचारांच्यापेक्षा स्वभावावर अवलंबून असतात.**
**- लो.टिळक**

# माणुसकीचा महापूर

सौ. नीलिमा विष्णू विद्वांस

ईश्वरानी बुद्धिमान मानव प्राणी निर्माण केला आणि मानवाने ह्या देणगीचा अगदी पुरेपूर उपयोग केला. अनेक नवीन तंत्रे वापरून छोटी-मोठी यंत्रे तयार केली. त्याच्या साहाय्याने कमी वेळात भरपूर मालाची निर्मिती होऊ लागली. सारीकडे आनंदी वातावरण दिसू लागले आणि मानवाची हाव वाढू लागली. ती इतकी की त्याने निसर्गावर ही मात करण्यास सुरुवात केली. प्रयत्न सफल झाले आणि मानव कृतकृत्य झाला. त्याने आरशातील आपल्या प्रतिबिंबाला शाबासकी दिली. मी काहीही करू शकतो हा दशरंगीझेंडा हाती घेऊन तो नाचू लागला. आपल्याच कर्तृत्वावर खूश झाला.

त्याने निसर्गनिमित सागरालाही मागे हटविले. त्यात मोठमोठे खडक टाकून तो पृथ्वीच्या पोटात दडपला. सागर आतल्या आत उसळ्या मारून आपला राग व्यक्त करीत होता. कधी कधी तर खदखदून हसत ही होता, पण आपल्याच कामगिरीवर खूश असलेल्या मानवाला हा सुख-दु:खाची नखा एवढीही जाणीव नव्हती आणि पर्वा तर नव्हतीच नव्हती.

खाड्या, नद्या, ओढे, नाले आणि विशाल सागर आपआपल्या दिमाखात वाहत होते. साऱ्या मानव जातीला खूप सुंदर नयनमनोहर रूप दाखवित होते. तर कधी मानवाच्या मनातील वादळे शांत करीत होते. कधी कधी गूढ विचारात रमवित होते. कधी विशाल विचार मानवाच्या मनात ठसवित होते. पण कर्तृत्वाची धुंदी चढलेल्या मानवाला ह्या साऱ्याची गरज वाटत नव्हती. त्याला आपल्या बुद्धीच्या ताकदीची भरारी मारायची होती तो त्या कार्यात मग्न झाला होता.

म्हणूनच त्याने उत्तुंग इमारती बांधल्या. पहावे तिकडे गगनचुंबी इमारती. गच्चीवरून आकाशालाही हात लावता आला पाहिजे, इतक्या उंच. इमारती वाढल्या, उद्योगधंदे वाढले आणि लोकसंख्याही. ती इतकी वाढली की ह्या इमारती कमी पडू लागल्या. मग अनेक कोसांच्या झोपडपट्ट्या वाढल्या. अनेक चांगली माणसे नाईलाजाने तिथे राहू लागली. तरी ही घरे अपुरी पडू लागली. मग मात्र माणूस पिसाट झाला. त्याचे ध्येय ठरले अजून खूप उंच इमारती बांधणे. दिवस-रात्र एक करून त्याने देवाने निर्माण केलेले स्वच्छ, सुंदर पाणी हटविले,सगळे पाणी बुजविले. आणि मोजतानाही मान मोडेल असे मजले चढविले. आता पाण्याचे साठे कमी आणि इमारती जास्त. कुठे ही नजर टाका इमारतीच. डावीकडे-उजवीकडे, अल्याड, पल्याड, गोल फिरा सारीकडे इमारती. त्या दिमाखाने उभ्या दिसल्यावर तो खूपच खूश झाला. पण प्रत्येक गोष्टीला मर्यादा ही असतेच हे मानव पार विसरला. पण निसर्ग जागा होता. धुंदीत बेसावध असणाऱ्या मानवाला त्याने जबरदस्त तडाखा दिला. २५ जुलै २००५. दिनांक २५, २६ ला सारीकडे वरूण राजा बेछूटपणे बरसला. परिणाम नद्यांना पूर आले. धरणांचे पाणी सोडले त्यामुळे जिकडे-तिकडे पाणीच पाणी झाले. कंदबवृक्षावर बसून मोहन शांतपणे बासरीवर सूर काढीत होता पण.... दिसत नव्हता. ''मोहन अरे तू आहेस तरी कुठे? करंगुळी वर धरून तू आमचे रक्षण कररे बाबा'' असा टाहो मानव फोडीत होता, तर मुरारी गालातल्या गालात हसून म्हणत होता, ''आमच्या निर्मितीवर मात करून मिजास करीत होतास ना? मग आता भोग आपल्या कर्माची फळे. आता का रे बाबा टाहो फोडतोस?''

अपराध एकाचा तर शिक्षा मात्र निरापराध गरीब जनतेला झाली. घरे, दारे, माणसे, भांडी-कुंडी, कपडे, जनावरे, अन्न-धान्य सारे वाहून गेले. जलदेवतेने साऱ्यांना आपल्या पोटात घेतले. मुके प्राणी तर किती गेले याची तर गणनाच नव्हती. सारीकडे भयानक भीषणता पसरली होती. सर्वत्र पाणीच पाणी. पण प्यायला थेंब ही नाही अशी अवस्था होती. दूध नाही, लाईट नाही, फोन बंद, भाजी नाही. सारीकडे नन्नाचा पाढा. आता मात्र कर्तृत्ववान मानव हतबल झाला. निसर्गापुढे त्याची मान खाली झाली. ह्या रुद्रस्वरूपाला तो थोपवू शकला नाही. त्याच्या इमारतींचा दिमाखही खाली झाला. सगळ्या सुंदर इमारती कुरुप झाल्या. त्यांचे हाल झाले. मी आणि माझे म्हणणारा मानव ह्या विराटरूपाने मुका झाला. त्याचे कर्तृत्व धुळीत नव्हे, महापुरात वाहून गेले. ''मी पणाचा गर्व करू नको हा धडा निसर्गाने त्याला दिला. तू आणि तुझे महान कर्तृत्व एका क्षणात मी नाहीसे करू शकतो, होत्याचे नव्हते करून नामानिराळा ही राहू शकतो. तू काय माझे वाकडे करू शकशील?'' हा खडा सवाल खड्या आवाजात मानवाला विचारतो. पण महासागराच्या मैलोगणती उचंबळणाऱ्या लाटाच्या निनादाने, वरूणर राजाच्या मुसळधार बरसण्याने मानव बहिरा झाला होता आणि ह्या भयानक प्रसंगाने त्याची वाचाही गेली होती म्हणूनच तो मूकबधीर होऊन वावरत होता.

आणि ह्या साऱ्या गदारोळात माणुसकीचे मोहळ उठले. जात-पात, धर्म सारे लयाला गेले आणि माणुसकीचा धर्म नव्याने जागृत झाला. एरवी शेजारील ब्लॉकमधील माणसे कोण? त्यांचे व्यवसाय काय? ह्याचा पत्ता नसतो, पण आता मात्र एका इमारतीतील माणसे पाण्याचा सागर पार करून पलीकडील इमारतीकडे मदतीसाठी धाव घेत होती. मदत करणे एवढेच डोक्यात असल्याने आपल्या जिवाची पर्वा न करता लागेल ती मदत करीत होते. तळ-मजल्यावरील माणसे तिसऱ्या, चौथ्या मजल्यावर नेली जात होती. अंग पुसण्यापासून वापरण्यासाठी कपडे देणे, चहा-खाणे देऊन विश्रांतीसाठी ही जागा देत होते. आणि हे सारे खुशीने केले जात होते अर्थात, ही सारी व्यवस्था करताना कष्ट आणि अडचणी ही होत्याच, पण नाराजी न दर्शविता आपलेपणाने सारे चालले होते.

पाण्यातून चालता ही येत नव्हते, पण साखळी करून एकमेकांना सांभाळून वाटचाल

होत होती. लहान शाळकरी मुले, बाया, तरुण-तरुणी, वृद्ध ह्यांना सुरक्षित स्थळी नेण्यासाठी वहाने भरभरून जात होती. मुंगीच्या पावलांनी गाड्या सरकत होत्या. पण सारे एकाच घरातील असल्याप्रमाणे वागत होते. पाण्यातून चालताना तरुण तरुणींचे हात धरून त्यांना त्यांच्या घरापर्यंत पोहोचवत होते. ह्या वेळेस तो हात फक्त भावाच्या मदतीचा होता. संकटात सापडलेली माझी ही बहीण हीच भावना त्याच्या मनात होती. एरवी वयाचा विचार ही न करता काहीही घडत असते, पण ह्या संकटानी सर्वांची बुद्धी शाबूत ठेवली होती. टेंपोत अनेक वयाच्या स्त्रिया, पुरुष अगदी ठासून भरले होते. हात-पाय हलवणेही मुश्किल होते. वरून पाऊस-भुकेने पोटात डोंब, उभे राहून पायात गोळे, आवश्यक क्रियाही बंद. अशा अवघड स्थितीत सारेजण एकमेकाला धीर देत होते, जपत होते. गाडी पाण्यात उभी, लाईट नाही, मिट्ट काळोख. पाण्याचा सागर त्यात माणसांचाही महासागर, पण तरीही कुठे वावगे वागणे नाही. कुणाच्याही डोक्यात, मनात क्रूर विचार शिरत नव्हते ही केवढी मोठी माणुसकी जागृत झाली होती. नाहीतर काहीही होऊ शकले असते ना? फक्त क्षणभर विचार करा म्हणजे त्यातील सत्य कळेल. पण मनाच्या सात्त्विकतेचे दार खुले झाले असल्याने नसत्या गोष्टींना वाव नव्हता. केलेले संस्कार उपयोगी पडत होते. ही मोठी परमेश्वराची कृपा होती असेच म्हणावे लागेल.

अनेक लहान गाड्या पाण्यात होत्या. गाडीत ही पाणी त्यामुळे आतील लोकांना बाहेर पडता येत नव्हते. तहान, भूक तर लागलीच होती, पण गारठ्याने थंडी वाजत होती. अशा वेळी अनेक मातांनी चहाचे वाफाळलेले कप पुढे केले एकदाच नव्हे, तर अनेकदा. त्यामुळे थोड्या प्रमाणात तरी त्याची थंडी कमी झाली होती म्हणूनच त्यांनी दिलेले आशीर्वाद, शुभेच्छा त्या माता, भगिनींना कितीतरी जन्म पुरतील. त्याच प्रमाणे किती ताई, माईंनी केळी, बिस्किटे, सामोसे असे अनेक खाद्य पदार्थ पुरविले. तेव्हा घेणाऱ्यांच्या डोळ्यांतील भाव कृतज्ञता व्यक्त करून सारे काही सांगून गेले होते. भावनावेगाने ती सारी मंडळी जणू मुकीच झाली होती. मायेच्या ओलाव्याने त्यांचे डोळे सतत पाणावत होते, तर अशा तऱ्हेने मदत केली जात होती. वेळ निभावून नेली होती. मदत करणाऱ्यांची नावे कुणाला माहीत नव्हती. आणि नाव जाहीर करून कुणालाही मोठेपणा नको होता. मदत करणे एवढेच ध्येय होते. एकीकडील साध्य झाले की सारी मंडळी नव्या दमाने दुसरीकडे मदतीला हजर होत होती. पाण्यातून लोकांना वाचवून त्यांना योग्य जागी ठेवून परत दुसऱ्यांसाठी पाण्यात शिरत होती. अशी अविश्रांत मदत चालली होती. काही लोकांना दुसऱ्यांना वाचविता आले होते, पण स्वत: त्यांच्या घरी न पोहोचता त्याच पाण्यातून वाहून गेले होते. तिथेच त्यांना जलसमाधी मिळाली होती. काय हा योग की भोग? नियतीची करामतच वेगळी. एकेकाचे नशीब असे म्हणावे लागेल. दुसऱ्याचे प्राण वाचवून जे शहीद झाले त्यांना माझे कोटी कोटी प्रणाम. तर ज्यांनी लोकांना तारले आणि स्वत:ही तरले त्यांनाही माझे वंदन. सारेच धन्य आहेत.

हे निसर्गराजा तुझ्या रुद्ररूपाने सारे थरारले, पण माणुसकी अगणित पटीने जागृत झाली. तुझ्या शापापेक्षा माणसाने माणसांना दिलेले आशीर्वाद, धन्यवाद कोटींकोटी वर्षे पुरतील. बुद्धीमान मानवाची मान नेहमी वरतीच राहील. आणि नकटे असले तरी ही नाकसुद्धा वरतीच राहील. असा ही एक दिवस उगवेल तू ही मानवाला शाबासकी देशीलच देशील.

**- सौ. नीलिमा विष्णू विद्वांस**
विकास कॉलनी, समतानगर, मराठी शाळेजवळ,
पटवर्धनांचे घर. मु.पो. माणगाव, जिल्हा - रायगड,
ता. माणगाव - ४०२ १०४
मो. : ९८६०८३४८६१

*राम नामीं मना रमवा आत्मा रामी मना रमवा।।धृ।।*
*पंचतत्त्व प्रकृति शरीरी, देह लाडला मैना डोली*
*नामी तिला रिझवा ।।१।।*
*आत्मारामी मन गंगेच्या भरून कावडी,*
*त्याही रिताव्या नाम सागरी*
*गुरू रामी मना रमवा ।।२।।*
*आत्मा नटखट वैखरी रामी रमेना,*
*विषय विकारी गाठ सुटेना*
*जिव-शिव हा सोडवा ।।३।।*
*आत्मारामी पहा पहा ही ग्रंथी सुटली*
*राम नामाची गोडी लागली*
*जीव हा रामी वहावा ।।४।।*



**- श्री. शरश्चंद्र केशवराव मराठे,** १०८६, सत्यम, विद्यानगर, भंडारा - ४४१ ९०४

**वैकुंठवासी ती. पिताश्री दामोदर हरि मराठे यांच्या पवित्र, प्रेमळ स्मृतीस अभिवादन**
श्री. प्रभाकर मराठे (पृ.१२०) ८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१
सेल : ९८२०२३२०८२ दूरध्वनी : २४१५०८८९ई-मेल : **prabhakar_marathe@yahoo.com**

पत्र हे एक माध्यम आहे. बोलणे किंवा संदेश आहे. बोलणारा आणि ऐकणारा किंवा लिहिणारा, वाचणारा यांच्यामधला तो दुवा आहे आणि म्हणूनच आपल्या कुलभगिनी सौ. वत्सला स. मराठे यांच्या पुढील पत्रातून प्रिय संजीवला केलेला उपदेश हा कोरडा उपदेश न वाटता अंत:करणाच्या तळमळीने केलेले भावनिक, मौलिक मार्गदर्शन मनाला पटणारे आहे. प्रत्येक तरुणाने ते आवर्जून वाचावे व त्याप्रमाणे वागावे.

- संपादिका

।।श्री।।

प्रिय संजीव,

यास अनेकोत्तम आशीर्वाद

*आजपासून तू गृहस्थाश्रमी झालास, आईचे अनुभव थोडेसे गाठीशी असावेत म्हणून हा पत्रप्रपंच.*

*वरात घरात येताच नातेवाईक तुम्हा दोघांकडे उत्सुकतेने पाहतील. तुम्ही एकापाठोपाठ नातेवाईकांच्या पाया पडू लागताच त्यांच्या तोंडून आपोआप खालीलप्रमाणे शुभेच्छा येऊ लागतील.*

*आजी म्हणेल, 'सुखी हो.'*

*ताई म्हणेल, 'आई-नानांना अंतर देऊ नकोस.'*

*मामी म्हणेल, 'आता न तू एकटा'*

*आत्या म्हणेल, 'तिला उत्तम साथ दे.'*

*माधुरी म्हणेल, 'दादा, आम्हाला घर उघडं राहिलं ना?''*

*मावशी म्हणेल, 'आठवणीने तिला आणत जा हो.'*

*इतर नातेवाईक म्हणतील, 'सर्वांना सुख द्या हो.'*

*अशा या शाब्दिक आशीर्वादांनी भरलेल्या घरांत तुम्ही गृहप्रवेश कराल.*

*तुला वाटत असेल की, जग जिंकलं आपण कारण सीए होऊ घातलेली जोडीदारीण आपल्याला मिळाली. पण इथेच तू चुकतो आहेस. अरे ज्ञान हे परिपूर्ण हवेच, पण त्याचबरोबर सुसंस्कृत मनही हवे. परक्याच्या घरी वाढलेली ही तुळस आता आपल्या दारी लावण्यासाठी आणली आहेस, मूळ पुष्कळसं तिकडेच आहे. नवीन रोप आपल्याकडे अजून रुजायचं आहे. वात्सल्याचं खतपाणी, प्रेमाचा आपलेपणाचा सूर्यप्रकाश त्याला मिळायला हवा म्हणजे ते रोप वाढेल, तरारेल, फुलेल.*

*इसापनीती तू वाचली असशीलच, एक मुंगी शिकाऱ्याला चावली म्हणून शिकाऱ्याचा नेम चुकतो व पोपटाने झाडावरून पान टाकलं म्हणून मुंगी पाण्यातून पलीकडे गेली. किती साधी गोष्ट आहे ना?*

*थोडक्यात काय तर, कुणालाही कमी लेखू नका. नेहमी माणसे जोडावीत बरं. श्रीशिल्लक म्हणून पगारातून १० टक्के गंगाजळी म्हणून शिल्लक ठेव. रात्री, अपरात्री गरजेला येईल ती.*

*ज्येष्ठांबद्दल आदर ठेवायला शिका. आता हेच बघ ना, एका शिखाने बसमधील सीट आजींना देऊ केली. आजी म्हणाल्या, ''बाळ बस हो तू.'' पण तो लगेच म्हणाला, ''नही माताजी मैं ने आपको जगह दी इसी तरह मेरे मुलुखमेंभी कोई उठकर मेरे मातापिताको जगह देंगे.'' याला म्हणतात विचारांची परिपक्वता.*

*शब्द शब्द जपून बोल. दुसऱ्याला कमी लेखून आपला मान कधीच वाढत नाही. तू १२वीत असताना बेस्ट कंपनीत नोकरीस लागलास, म्हणून वागण्या-बोलण्यांत थोडी ग ची बाधा जाणवते म्हणून शब्दरूपी प्रपंच.*

**- सौ. आई**

**- सौ. वत्सला स. मराठे (पृ.४२७)**

C/o. स. गो. मराठे, बी/५/२७ बेस्ट राजहंस,

घाटकोपर, मुंबई ४०० ०७५

## नांदा सौख्यभरे

वांद्रे (मुंबई) येथील आपले कुलबांधव व पूर्वी मराठे प्रतिष्ठान कार्यकारिणीतील कोषाध्यक्ष म्हणून काम पाहणारे श्री. सदानंद विष्णू मराठे व त्यांच्या पत्नी सौ. मीना यांची सुकन्या चि.सौ.कां.अनुजा हिचा शुभविवाह चि. राहुल अरूण कान्हेरे, पुणे यांच्याबरोबर चैत्र कृष्ण तृतीया, गुरुवार दिनांक १ एप्रिल, २०१०ला सकाळी १०वा.५५मि. कामायनी हॉल, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे तसेच प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. मोहनराव मराठे, विख्यात निवेदक श्री. भाऊ मराठे वधुवरांना आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होते. नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक शुभेच्छा!

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मराठे प्रतिष्ठानची कार्यकारिणीची सभा शुक्रवार दिनांक २६ फेब्रुवारी, २०१०ला दुपारी ४.०० वाजता ठाणे येथे प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे यांच्या निवासस्थानी झाली.

कार्यवाह श्री. हेमंत मराठे यांनी पत्र-व्यवहाराचे वाचन केले. मागील सभेतील इतिवृत्त वाचले. वास्तूप्रकल्प आणि ८०जी सवलत कशी मिळवावी यावर चर्चा झाली. उद्योजक पुरस्कार श्री. अरविंदराव मराठे, चिंचवड यांना २६जानेवारी या दिवशी निर्माणग्रुपचे संचालक श्री. अजितकुमार श्रीराम मराठे हे देणार होते, पण काही अपरिहार्य कारणामुळे ते जाऊ शकले नाहीत, तेव्हा अध्यक्षांनी कार्यवाह श्री. हेमंतला दिलगिरी व्यक्त करणारे पत्र श्री. अरविंदराव यांना पाठविण्यास सांगितले. त्याची एक प्रत श्री. अजितकुमारांना पाठवावी असे सांगितले आणि मानपत्र आणि पुरस्कार लवकरच अरविंदरावांना देण्यात येईल असे ठरले.

मराठे प्रतिष्ठानची घटना दुरुस्ती करण्यासाठी शनिवार दिनांक १० एप्रिल २०१० ला मराठे उद्योग भवन, प्रभादेवी येथे सभा घेण्याचे ठरविले गेले. या सभेला श्री. श्रीनिवास मराठे आणि सौ. नीलांबरीताई पुण्याहून आल्या होत्या. त्यांना त्यांचे येणे आगंतुक वाटले ते सर्वांनी नाकारले आणि तुम्ही मराठे आहात, पुणे कार्यकारिणीतील काम करणाऱ्या सर्व सदस्यांचे मिटिंगमध्ये स्वागतच होईल. मराठे प्रतिष्ठानची दैनंदिनी, वास्तूप्रकल्पचा हॉल खर्च इ. विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

श्री. आनंदरावांच्या कुटुंबीयांनी म्हणजे सौ. नंदिनी वहिनी आणि सून सौ. सुप्रिया यांनी मस्तपैकी शेवरस्सा व रोल आणि गाजर हलवा हा मेनू उत्कृष्ट केला होता. त्याचा स्वादिष्टपणे सगळ्यांनी रसास्वाद घेतला.

याच मिटिंगमध्ये 'हितगुज'ची डी.टी.पी. करणारी सौ. अनघा विवेक मराठे ही (आनंदरावांची सून) उपस्थित होती. तिची सर्वांशी ओळख करून देण्यात आली.

पुढची बैठक १८ मार्च २०१० ला सी. गो. खांबेटे यांच्या अंधेरी येथील घरी घेण्याचे ठरले. आणि बराच वेळ चाललेली बैठक संपली.

❁

दि. १८ मार्च २०१० ला मराठे प्रतिष्ठान-मध्ये सुरुवातीपासून कार्य करणारे कोषाध्यक्ष, सहसंपादक, लेखक, प्रकाशक, कुलवृत्तांतकार श्री. सी. गो. खांबेटे यांच्या अंधेरी येथील निवासस्थानी सकाळी ११ वाजता मराठे प्रतिष्ठान कार्यकारिणीची बैठक जमली. सभेत मागील इतिवृत्त वाचून दाखविले. कर्नाटकातील मराठे परिवाराचे काम, 'वंश' मासिकाचे प्रकाशन, कुलवृत्तांत, वास्तूप्रकल्प या विषयांवर चर्चा झाली. श्री. शरद मराठे व सौ. वर्षा मराठे या बैठकीला उपस्थित होते. स्वादिष्ट भोजनाचा लाभ बैठकीनंतर श्री. सी. गो. खांबेटे व सौ. माधुरी खांबेटे यांनी आग्रहाने केला.

❁

शनिवार दिनांक १० एप्रिल २०१० ला संध्याकाळी ४ वाजता मराठे उद्योग भवनात प्रतिष्ठानची बैठक भरली. विशेष सर्वसाधारण सभा असूनही कुलबांधवांची उपस्थिती अल्प होती. कार्यकारिणीतील सदस्य मात्र बहुसंख्येने उपस्थित होते. प्रतिष्ठान सर्व कुलबंधु-भगिनींसाठी आहे असं नुसतं बोलून उपयोग नाही, तसा प्रत्यय आला पाहिजे. आपली सुखं-दु:खं एकमेकांना सांगितली पाहिजेत. या सुखसंवादानेच आत्मीयता वाढते, आपल्या मैत्रीला नवीन परिमाण प्राप्त होतो. त्यांच्या कक्षा वाढतात.

या सभेत मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले, पत्रव्यवहारावर चर्चा झाली. श्री. सी. गो. खांबेटे यांचे स्नेही श्री. ओक बैठकीत आले होते. त्यांनी कुलवृत्तांत अद्ययावत कसा प्रकाशित करावा याविषयी आपल्या कुलबांधवांना बहुमोल मार्गदर्शन केले. घटना बदलण्यासाठी काय गोष्टींची आवश्यकता असते याविषयी चार्टर्ड-अकौंटंटचा सल्ला (समादेश) घेण्यात आला. याविषयी महत्त्वाची चर्चा झाली.

श्रीमती सुलभाताईंनी खास घारगे (भोपळ्याच्या गोड पुऱ्या) घरून करून आणल्या होत्या. त्याचा आस्वाद घेऊन चहापानाने बैठक संपली.

## ☯ हसरे हितगुज ☯

*मी तुझं नाव वाळून लिहिलं .................... ते वाहून गेलं.*
*मी तुझं नाव हवेत लिहिलं .................... ते उडून गेलं.*
*मी तुझं नाव ह्दयात कोरलं ................... मला हार्टअ‍ॅटॅक आला*

❁

*ज्यांना शक्य असतं, ते करतात*
*ज्यांना जमत नाही, ते शिकवतात.*

# अनासक्त कर्मयोगी : श्री. दामोदर हरी मराठे

डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ. १२०)

मराठे प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष चार्टर्ड अकौंटंट श्री. प्रभाकर दामोदर मराठे (पृ.१२०) यांचे वडील श्री. दामोदर हरि मराठे यांचे रविवार दिनांक १४ मार्च, २०१० ला वार्धक्यामुळे दुःखद निधन झाले. त्यानिमित्ताने त्यांच्या सूनेने त्यांना लेखरूपाने वाहिलेली श्रद्धांजली

आमचे लग्न होऊन मी सासरी येताना, ''ही मुलगी आता आमची झाली, ही मुलगी आता आमची झाली...ही मुलगी आमची झाली'' असे त्रिवार- तीन वेळा आत्मविश्वासाने म्हणणारे माझे सासरे श्री. दामोदर हरि मराठे, चतुर्दशी, रविवार दि. १४ मार्च, २०१०ला वयाच्या ८८व्या वर्षी रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी हे जग सोडून वैकुंठाला गेले. 'टाळी वाजवावी गुढी उभारावी। वाट ती चालावी पंढरीची।।' असे जणू म्हणत गुढीपाडव्याच्या दोन दिवसच आधी ते पंचत्वात विलीन झाले.

शरीर हे दुखण्यासाठीच असतं, तेव्हा तक्रार कसलीही करायची नसते असं तत्त्वज्ञान सांगणारे आणि ते आचरणात आणणारे आमचे दादा होते. आम्ही त्यांना 'दादा' म्हणत असू. दादांच्या निधनाने एका अनासक्त कर्मयोग्याचे ऐहिक निर्वाण झाले. 'कर्मणि एव अधिकार: ते' या गीतावचनाचा जन्मभर पाठपुरावा करीत राहिले.

दिनांक १-११-१९२२ हा दादांचा जन्मदिनांक. कोकणातील 'हिंदळे' हे त्यांचे गाव. बालपणीच मातृसुख हरपले. तेव्हा मुलांना सावत्र-पणाचा जाच नको म्हणून त्यांच्या वडिलांनी ते तरुण असूनही, रेल्वेत स्टेशनमास्तर असतानाही दुसरे लग्न केले नाही. शिक्षणासाठी त्यांनी हिंदळे सोडले आणि मुंबईत राहण्यासाठी आले.

**आत्म्याशी प्रामाणिक :** असे सांगतात की, म्हणजे मी ऐकलेली सत्य हकिगत आहे ती. त्या वेळी १९४२ च्या आंदोलनात भारताला स्वातंत्र्य मिळविण्यासाठीची चळवळ जोरात चालू होती. ठिकठिकाणी आंदोलनांनी उग्र रूप घेतले होत. त्यामुळे पोलीस लाठीमार करून धरपकड करून आंदोलकांना तुरुंगात डांबत होते. त्या वेळी ती. दादा एका मित्राबरोबर पत्ते खेळण्यात रमले होते. त्यामुळे त्यांना काही या रणधुमाळीची



कल्पना आली नाही. नेमके त्याच वेळी पोलिसांनी त्यांना पकडून आतमध्ये - तुरुंगात टाकले. चार-पाच महिन्यांनी त्यांना सोडले. ती. दादांना सर्वांनी आग्रह केला, की तू तुरुंगात गेला होतास, तर स्वातंत्र्यसैनिक झाला आहेसच. तेव्हा 'स्वातंत्र्यसैनिक' म्हणून लाभ पदरात पाडून घे. परंत ती. दादांनी स्वत:ला 'स्वातंत्र्यसैनिक' म्हणून म्हणवून घ्यायचे नाकारले. चुकून परिस्थितीत प्रसंगापरत्वे पकडून तुरुंगात टाकला गेलो मग हा खोटेपणा कशाला? ती. दादांनी स्वातंत्र्य-सैनिक म्हणून कसलाही लाभ उकळला नाही. आता स्वातंत्र्यसैनिक (खोटे) म्हणवून घेऊन सवलती, फायदे उकळवण्यात अग्रेसर असलेल्या तथाकथित महाभागांमध्ये ती. दादांचा प्रामाणिक-पणा लक्षणीय ठरतो. ती. दादांनी खोटेपणा केला नाही, तो त्यांचा स्वभावच नव्हता. प्रांजळ प्रामाणिकपणामुळे ती. दादांचे वेगळेपण उल्लेखनीय ठरते.

**खेळाडूंना प्रोत्साहन :** वडाळा सहकार-नगरमधील 'सहकार कला-क्रीडा मंडळा'चे ते अनेक वर्षे अध्यक्ष होते. पण नुसते अध्यक्षपद भूषविणाऱ्यांपैकी ते नव्हते, तर स्वत: जातीने रोज मैदानावर जाऊन खो-खो संघाचा सराव पाहत. त्यांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे, खेळाडूंना दिलेल्या पाठिंब्यामुळे 'सहकार क्रीडा मंडळ'चा खो-खो स्पर्धेत नेहमी विजय होत असे. खेळाडूंना मार्गदर्शन करीत. योग शिकवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करीत. आत्मीयतेने, प्रेमाने त्यांच्या अडीअडचणी सोडवित. त्यांना अभ्यासात मदत करीत. त्यामुळे ती. दादांविषयी एक प्रकारचा आदर सर्वांना वाटत असे.

काही काळ ते वडाळा विठ्ठलमंदिराच्या समोरील चाळीत राहत होते. आषाढी एकादशीच्या दिवशी प्रतिपंढरपूर समजल्या गेलेल्या या विठ्ठल मंदिरात मोठी जत्रा भरत असे. त्यातही ती. दादांचा सहभाग असे. गर्दीत हरवलेल्या मुलांना शोधणे, त्यांना सांभाळणे, त्यांना सुखरूपपणे त्यांच्या आई-वडिलांच्या स्वाधीन करणे. दमलेल्या वारकऱ्यांचे आरोग्य पाहणे, औषधपाणी देऊन, प्रथमोपचार करणे ही कामे ते आवडीने करीत असत. महानगरपालिकेतील नोकरी संपवून ते निवृत्त झाले त्यानंतर त्यांनी सलग आठ-नऊ वर्षे पायी चालत पंढरीची वारी केली. त्यांची दिंडी ही शेतकऱ्यांची दिंडी होती. दिंडीत ते 'डॉक्टर' म्हणून ओळखळे जात, कारण डबा भरून औषधाच्या गोळ्या ते घेऊन जात आणि दुखलं-खुपलं की गोळ्या बरोबर देत. औषधाचा गुण आल्यामुळे वारकऱ्याला बरं वाटे.

पर्यटनाची-प्रवासाची त्यांना आवड होती. ती. सासूबाई आणि दादा या दोघांनी मिळून संपूर्ण भारत पाहिला. प्रवासाचा मनमुराद आनंद घेतला.

काही काळ लोणावळ्याला वानप्रस्थाश्रमात

राहून 'वानप्रस्थी' म्हणूनही ते जगले.

मराठे प्रतिष्ठानचे भीष्म पितामह, मराठे घराण्याचा पहिला कुलवृत्तांत लिहिणारे श्री. वि. गो. तथा भाऊसाहेब मराठे हे त्यांचे बालपणापासूनचे जिवलग मित्र होते. अगदी आजपावेतो अमेरिकेतून नेहमी भाऊसाहेब दूरध्वनीवरून बोलून आपल्या मित्राशी, 'दामू'शी गप्पा मारून संवाद साधत असत. 'हितगुज'चेही मन भरून कौतुक करीत असत.

मराठे प्रतिष्ठानचे संमेलन बिंबल (गोवा) येथे दिनांक १मे ते ३मे २००५ ला भरले होते. त्या संमेलनातही ती. दादांचा ज्येष्ठ कुलबांधव म्हणून सत्कार झाला होता.

मोहन (श्री. प्रभाकर) हा त्यांचा एकुलता एक मुलगा आणि चि. निरंजन व कु. मधुरा ही त्यांची लाडकी नातवंडे होती. सौ. भक्ती या नातसूनेच्या हातचा चहाही त्यांनी प्यायला. आजीवन, शेवटपर्यंत ते माझ्याशी मुलीसारखेच वागले. सासरेपणा त्यांनी कधीही गाजविला नाही. ही मुलगी आमची झाली म्हणणारे ती. दादा आम्हाला पोरके करून गेले. मातृ-पितृ छत्र हरपले. आई सौ. मंदाकिनी मराठे दिनांक २४ ऑगस्ट २००२ला गेल्यानंतर दादांच्या रूपाने पितृछत्र होते. बाहेरून येण्याऱ्या विघ्नांपासून, संकटांपासून संरक्षण करणारे ती. दादांचे कवच होते. त्यांच्या जाण्याने ते आता उरले नाही. आम्हाला 'मोठे' करून ते गेले.

त्यांना मृत्यूही सुखाचा आला. घरघर नाही की उचकी नाही, ठसका नाही की खोकला नाही. सहजपणे त्यांनी शेवटचा श्वास कधी नकळत सोडला हे त्यांचे त्यांनाही कळले नसेल. जाते वेळी आम्ही सर्व घरातच त्यांच्याजवळच होतो. भरल्या घरातून त्यांचे जाणे म्हणजे आम्हाला अगदी सुनंसुनं वाटते. घरातील ज्येष्ठ, वडीलधारी कुटुंबप्रमुख जाण्यामुळे घर अगदी 'पोकळ', 'रिकामं' वाटतं.

''विनायासेन मरणं, विनादैन्येन जीवितम्, देहान्ते तव सान्निध्यं देहि मे मधुसूदना।'' ही इच्छा त्यांची पूर्ण झाली. ती. दादांचे कृपाशिर्वाद सदैव आमच्या पाठीशी राहतील. वै.ती. दादांच्या तत्त्वशील व सद्वृत्त आचरणांचे पालन करीत राहणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
(संपादिका : हितगुज - मराठे प्रतिष्ठान)
८/१३, सहकार नगर,
वडाळा, मुंबई ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

## 'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

पाव पान   रु. ६००/-
अर्ध पान   रु. १,२००/-
पूर्ण पान   रु. २,५००/-

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.

## वाचकांचा पत्रव्यवहार

मार्च १० चा अंक छानच! पण काही प्रतिक्रिया

१. 'बंदी हरी गोपाल' लेखाबद्दल श्री. अ.म. चक्रदेव व आपले अभिनंदन. माझी आणखी एक अपेक्षा पूर्ण करता आल्यास पाहावे. बंदी हरीला ज्या संस्थेने कामावर घेतले त्या संस्थेचा पत्ता, आजची किंवा हरीबद्दल संस्थेतील सेवेची संवेदनशील माहिती मिळाल्यास ती छापावी. तसेच श्री. चक्रदेव यांचा पत्ता, फोन कळवावा.

२. वेळेवर जरी सामान्यज्ञान स्पर्धा होती, तरी गुणांकनाच्या लेखी सूचना स्पष्ट होत्या काय? एवढाच मुद्दा स्पष्ट व्हावा.

३. 'वृद्धदिन' लेख ही विचारप्रवर्तक. आयुर्मान, आर्युमान तीन वेळेला चूक छापले जाते, हे पटत नाही.

४. 'होळी रे होळी' श्री.अ.द.मराठे यांचा लेख ही छान; नि यातून एक विचार मांडत आहेत. 'आदर्श होळीची संकल्पना' यावर ५० ओळींचे लेख मागवून स्पर्धा घ्यावी. किमान ५ छापावे. कालावधी आपण ठरवा.

५. प्रत्येक अंकात १ कविता, भजन (नवीन), इ. काव्य, स्फुटकाव्य अवश्य द्यावे.

**- श्री. शरश्चंद्र के. मराठे**
१०८६, सत्यम, विद्यानगर, भंडारा - ४४१ ९०४

ॐ

# मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८ (मुं.) दि.१२.१.८१

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५

दूरध्वनी : २४३०२४५३ * फॅक्स :९१-०२२-२४३७९८६३ * e-mail : maratheparivar@yahoo.com

**२८ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके :** १ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०

**वार्षिक सर्वसाधारण सभा :** रविवार दिनांक १ ऑगस्ट २०१० सायंकाळी ५.०० वाजता

**सभास्थान :** दामले योग केंद्र, मनमाला टॅक रोड, लोकमान्यनगर हॉलजवळ, माटुंगा (प.रे.), मुंबई- ४०००१६

## विश्वस्त मंडळ

| | | दूरध्वनी | वास्तव्य | कुवृपृ |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२५५२४ | ठाणे -प. | २७७ |
| २. श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त | ५२५१-२५७०६७७ | डोंबिलवी- पू. | २९२ |
| ३. डॉ. राजेंद्र विठ्ठल मराठे | विश्वस्त | २५४२१८९१ | ठाणे - प. | २९१ |
| ४. श्री. सतीश काशिनाथ मराठे | विश्वस्त | २४४५ ८६४६ | दादर -प. मुंबई | १२९ |
| ५. श्रीम. सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २४४४३०७४ | माहिम, मुंबई | ३९९ |

## कार्यकारी मंडळ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२५५२४ | ठाणे -प. | २७७ |
| २. श्री. रमाकांत माधव विद्वांस | सभासद | २४३०५२६० | माहिम, मुंबई | ६२३ |
| ३. श्री. मोहन सदाशिव मराठे | सभासद | २६४६४३५१ | खारा-प., मुंबई | ३६५ |
| ४. श्री. हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ९५२५०-२४३३०३८ | नालासोपारा | ०२१ |
| ५. श्री. प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २४१५०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| ६. श्री. विनायक केशव मराठे | कार्यवाह | २४३०३३२९ | वरळी, मुंबई | ०२० |
| ७. श्री. लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २५६८०१०४ | मुलुंड-पूर्व, मुंबई | ५२० |
| ८. श्री. सीताराम गोपाळ खांबेटे | सभासद | २६८३६९९४ | अंधेरी-पूर्व, मुंबई | ६७६ |
| ९. श्री. प्रमोद कृष्ण मराठे | सभासद | २५४७७५११ | ठाणे | ७६७ |
| १०. श्री. चिंतामण महादेव मराठे | सभासद | २४१५५३९० | परळ, मुंबई | २२२ |
| ११. सौ. अदिती यशवंत मराठे | सभासद | २४४४९२७४ | माहिम, मुंबई | ३९९ |
| १२. सौ. वर्षा शरद मराठे | सभासद | २८४१६७८७ | गोरेगाव | ०२१ |
| १३. डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद | २४१५०८८९ | वडाळा,मुंबई | १२० |
| १४. श्री. अरुण दत्तात्रय मराठे (पुणे) | सभासद | ९५२०-२४४७३२८९ | पुणे | ०६१ |
| १५. श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त-कायम निमंत्रित | ९५२५१-२४७०६७७ | डोंबिवली, पू | २९२ |
| १६. श्री. यशवंत सुरेश मराठे | कायम निमंत्रित | २४४४ ९२७४ | माहिम, मुंबई | ३९९ |
| १७. श्री. वामन गणेश मराठे | सभासद-कायम निमंत्रित | २८२६९४०२ | जोगेश्वरी, पू. मुंबई | ५०३ |
| १८. श्री. सुरेश मराठे | कायम निमंत्रित | ९५२५१-२४९४९५७ | डोंबिवली, पू.मुंबई | ५०३ |

**बँकर्स : १. सारस्वत बँक, प्रभादेवी, मुंबई * २. युको बँक, टिळक रोड, पुणे**

**मराठे प्रतिष्ठान**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना :**

मराठे प्रतिष्ठानची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १-८-२०१० रोजी सायंकाळी ५.०० वाजता दामले योग केंद्र येथे आयोजित केली आहे.

**सभेपुढील कामे :**

१. दिनांक २५ ऑक्टोबर २००९ रोजी झालेल्या २७व्या वार्षिक सर्वसाधारणसभेचा वृत्तांत वाचून मंजून करणे.

२. दिनांक ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षाचा मराठे प्रतिष्ठानचा अहवाल, ताळेबंद व जमाखर्च संमत करणे.

३. सन २०१०-२०११ च्या हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.

४. मराठे प्रतिष्ठानच्या पाचजणांच्या विश्वस्त मंडळाची पुढील सहा वर्षांसाठी निवड करणे.

५. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाची पुढील तीन वर्षांसाठी निवड करणे.

६. सभासदांकडून आलेल्या पत्रांवर, प्रस्तावांवर तसेच प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमांवर विचार विनिमय करणे.

७. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून,

**श्री. मोहन सदाशिव मराठे, कार्यवाह**

**२५ जून २०१०**

**टीपा :**

१. गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर भरेल. त्याला गणसंख्येची पूर्ती आवश्यक नाही.

२. वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके सोबत

दिली आहेत. काही खुलासा हवा असल्यास सभेच्या ७ दिवस अगोदर समक्ष किंवा पत्राने/ ई-मेलने विचारावा.

३. मराठे प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल प्रस्ताव, ठराव किंवा सूचना करावयाच्या असल्यास सभासदांनी त्या सभेच्या ७ दिवस अगोदर कार्यालयात किंवा ई-मेलने पाठवाव्यात. (e-mail : maratheparivar@yahoo.com)

४. सभेला येताना या अहवालाची प्रत आणावी.

५. सभेनंतर अल्पोपहाराची व्यवस्था आहे.

**मराठे प्रतिष्ठान**

**२८वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके (१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०)**

**सभासद बंधू-भगिनींनो,**

मराठे प्रतिष्ठानच्या दिनाकं ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजेच २८वा वार्षिक अहवाल कार्यकारी मंडळ सादर करीत आहे.

**सभासद :**

वृत्तांतसाली आजीव सदस्य संख्या (१४१८) १३ ने वाढून १४३१ झाली.

हितचिंतक संख्या ९, आश्रयदाता संख्या २१ झाली. सन्माननीय सदस्य संख्या (३) कायम राहिली. या वर्षीच्या सर्व नवीन सदस्यांचे मराठे प्रतिष्ठान स्वागत करीत आहे.

'हितगुज'ची तहहयात वर्गणीदार संख्या (११२६) ६ ने वाढून ११३२ झाली. मराठे प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यत्वासाठी प्रत्येक सज्ञान स्त्री-पुरुष व्यक्तीने किमान रु.१००/- शुल्क पाठवावे व प्रत्येक कुटुंबासाठी कुटुंबप्रमुख सदस्याने रु.१,०००/- 'हितगुज' तहहयात शुल्क आमचेकडे पाठवून मराठे प्रतिष्ठानला सहकार्य करावे.

**टीप :** आजीव सदस्यत्व त्या व्यक्तीच्या हयातीपर्यंतच असते. त्या व्यक्तीच्या निधनानंतर पुढील कुटुंबप्रमुखाने आजीव सदस्यत्व तसेच हितगुज तहहयात शुल्क भरावयाचे असते.

वार्षिक सर्वसाधारण सभा : मराठे प्रतिष्ठानची २७वी वार्षिक सर्वसाधारण सभा २५-१०-२००९ रोजी सायंकाळी ५.०० दामले योग केंद्र सभागृह, माटुंगा (प.) मुंबई येथे भरली होती. गणपूर्ती संख्या अभाव सभा त्याच ठिकाणी ५.३० वा. संपन्न झाली.

सभेचे अध्यक्षस्थान मराठे प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. आनंद मराठे यांनी भूषविले. सभासदांची उपस्थिती समाधानकारकर होती. या सभेत मागील सभेचे इतिवृत्त तसेच हिशेब पत्रके, ताळेबंद मंजूर करण्यात आला. त्यानंतर मराठे प्रतिष्ठानच्या मागील वर्षाच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.

**अहवाल सालातील महत्त्वाच्या नोंदी पुढीलप्रमाणे :**

१. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई आणि राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ, नवी दिल्ली या संस्थांचे कार्यकारी संचालक, लेखक, प्रवासवर्णनकार असलेले मराठे प्रतिष्ठानचे सक्रिय कार्यवाह श्री. मोहनराव मराठे (पृ.३६५) यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २००९ ला उदयपूर येथे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या हस्ते 'लाइफटाइम अचिव्हमेंट ॲवॉर्ड' (जीवनगौरव पुरस्कार) स्वीकारला.

२. दिनांक २५ डिसेंबर, २००९ ला पुणे शाखेच्या ३० व्या वर्धापनदिनी मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेपासून सक्रिय सदस्य असलेले शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत, लेखक गोव्याचे श्री. कालिदास मराठे यांच्या हस्ते २०१० च्या दिनदर्शिकेचे (डायरीचे) प्रकाशन थाटामाटात संपन्न झाले. या कार्यक्रमानंतर सौ. अनुराधा प्रभुदेसाई यांचे 'ऋणानुबंध जवानाचे' या विषयावर प्रभावी भाषण होऊन स्लाईड शो झाला. त्यानंतर श्री. अमरनाथ चक्रदेव यांनी नवरात्रातील अष्टमीच्या महालक्ष्मी उत्सवाची फिल्म दाखविली.

३. चिंचवड येथे राहणारे आपले एक कुलबांधव श्री. अरविंद वासुदेव मराठे यांना नॅशनल इकॉनॉमिक डेव्हलपमेंट ऑफ रिसर्च ऑर्गनायझेशन, न्यू दिल्ली या संस्थेच्यावतीने 'भारतीय उद्योगरत्न' हा पुरस्कार मिळाला.

४. रविवार दिनांक २५ ऑक्टोबर २००९ ला सायंकाळी ५ वाजता 'दामले योग केंद्र' सभागृह, माटुंगा येथे मराठे प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा भरली. मराठे प्रतिष्ठानचे सन्माननीय निर्माण ग्रुपचे संस्थापक, संचालक श्री. अजितकुमार श्रीराम मराठे यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. श्री. अजितकुमार यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.

५. मराठे प्रतिष्ठानचे ९वे अखिल भारतीय संमेलन दिनांक १ मे ते ३ मे २००९ला दुर्गग्रामी (ता. : कारकल, जिल्हा : उडिपी, कर्नाटक राज्य) श्री.विष्णूमूर्ती मराठे यांच्या अध्यक्षतेखाली थाटामाटात संपन्न झाले. तीन दिवस भरगच्च, दर्जेदार कार्यक्रम या संमेलनात सादर केले गेले. हे संमेलन चांगलेच परिणामकारक व संघटना वाढविणारे ठरले.

६. श्री. अनंत सदाशिव मराठे (पृ.३६५) ज्येष्ठ पत्रकार यांचा मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफल व पुष्पगुच्छ व ११,०००/- रु.चा धनादेश देण्यात आला. श्री. अनंतरावांनी त्या धनादेशात तेवढीच भर घालून पत्रकार संघाला परत केला.

सभेपुढे इतर कोणतेही कामकाज नसल्याने माननीय अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपविण्यात आली.

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT,1950**
**SCHEDULE VIII**
**[VIDE RULE 17 (1)]**

**Name Of The Public Trust : MARATHE PRATISHTHAN** **REG. NO. E-7918 (BOM)**

**INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED : 31ST MARCH,2010**

| **EXPENDITURE** | **RS.** | **RS.** | **INCOME** | **RS.** | **RS.** |
|---|---|---|---|---|---|
| To Audit Fees | | 750.00 | By Intersest on Fixed Deposits | | 11,520.73 |
| To Expenditure on the object of Trust | | | By Interest on Saving Bank Account | | |
| Mumbai Mukya Karyalaya Expeneses | | | With Saraswat Co-op Bank | 6,385.00 | |
| Annual Meeting Expenses | 2,260.00 | | With UCO Bank Pune | 1,794.00 | 8,179.00 |
| Postage & Distribution (MU) | 25.00 | | | | |
| Anita K. Khambete Smruti Prizes | 750.00 | | By Transfer from Various Nidhi & Yojana | | |
| Scholarship & Prizes | 5,450.00 | | Shikshan Nidhi (R) | 5,450.00 | |
| Contribution to Marathe Parivar | | | Anita Khambete Smruti Yojana | 750.00 | |
| Sammelan at Durga | 10,000.00 | | Vaidyakiya Madat Nidhi | 10,000.00 | 16,200.00 |
| Printing & Stationery (MU) | 1,300.00 | | | | |
| Vaidyakiya Madat Expenses | 10,000.00 | | By Sale of Kulvritant | | 750.00 |
| Bank Charges | 264.57 | 30,049.57 | By Pune Branch Income | | |
| | | | Vadhu Var Activity (PU) | | |
| Pune Branch Expenses | | | | | |
| Website Expenses | 6,500.00 | | By Pune Dainandini Income | | |
| Miscellaneous Expenses | 600.00 | | Advertisements | 44,451.00 | |
| Bank Chares (PU) | 55.00 | | Sale of Dainandini | 2,400.00 | 46,851.00 |
| Postage & Distribution (PU) | 266.00 | 7,421.00 | | | |
| Pune Dainandini Expenses | | | By Hitguj Prakashan Income | | |
| Printing, Distribution Etc. | | 33,821.00 | Advertisements | 5,000.00 | |
| | | | Transfer from Hitguj Nidhi | 84,722.00 | 89,722.00 |
| To Hitguj Prakashan Expenses | 60,712.00 | | | | |
| Hitguj Printing (MU) | 28,722.00 | | | | |
| Hitguj Postage (MU) | 288.00 | 89,722.00 | | | |
| To Income & Expenditure Account | | | | | |
| Surplus Being Excess of Income Over | | | | | |
| Expenditure C/F to Balance Sheet | | 11,459.16 | | | |
| | **TOTAL** | **1,73,222.73** | | **TOTAL** | **1,73,222.73** |

Note : The Headings as per the Prescribed
Form which are absent in the above Statement
Should be read As 'NIL'

**For Marathe Pratishthan**

TRUSTEE TRUSTEE

Subject to our report of Even Date
For **HMA & Associates**
Chartered Accountants

Partner
Membership No. 103650
MUMBAI

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950**
**SCHEDULE VIII**
**[VIDE RULE 17 (1)]**

**Name Of The Public Trust : MARATHE PRATISHTHAN** **REG. NO. E-7918 (BOM)**

**BALANCE SHEET AS AT...: 31ST MARCH,2010**

| FUNDS AND LIABITLIES | RS. | RS. |
|---|---|---|
| Kayam Nidhi | | |
| Balance as per Last Balance Sheet | 1,86,595.00 | |
| Add : Life Membership (MU) | 700.00 | |
| Add : Life Membership (PU) | 600.00 | 1,87,895.00 |
| Kulvruttant Nidhi | | |
| Balance as per last Balance Sheet | 17,704.00 | |
| Add : Interest | 1,416.00 | 19,120.00 |
| Shikshan Nidhi | | |
| Balance as per last Balance Sheet | 4,78,767.00 | |
| Add : Donation (MU) | 500.00 | |
| Add : Interest | 38,301.00 | |
| Less : Transfer to I&E A/c | (5,450.00) | 5,12,118.00 |
| Sureshbhau Smruti Nidhi | | |
| Balance as per last Balance Sheet | 71,719.00 | |
| Add : Interest | 5,738.00 | 77,457.00 |
| Udyojagta Paritoshak Nidhi | | |
| Donation During the year | | 21,000.00 |
| Udyog Pravartan Nidhi | | |
| Balance as per last Balance Sheet | 54,578.00 | |
| Add : Interest | 4,366.00 | 58.944.00 |
| Vishishta Hetu Nidhi | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,56,273.00 | |
| Add : Interest | 12,502.00 | 1,68,775.00 |
| Yuva Manch Nidhi | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,445.00 | |
| Add : Interest | 116.00 | 1,561.00 |
| Vaidyakiya Madat Nidhi | | |
| Balance as per last Balance Sheet | 44,921.00 | |
| Add : Donations (PU) | 1,000.00 | |
| Add : Interest | 3,594.00 | |
| Less : Transfer to I & E A/c | (10,000.00) | 39,515.00 |
| Hitguj Nidhi | | |
| Balance as per last balance Sheet | 3,13,614.92 | |
| Less : Refunded to Donor | (12,500.00) | |
| Add : Donation (MU) | 89,453.00 | |
| Add : Subscription (MU) | 400.00 | |
| Add : Subscription (PU) | 10,500.00 | |
| Add : Interest | 24,993.00 | |
| Less : Transfer to I & E A/c | (84,722.00) | 3,41,838.92 |
| | **TOTAL B/F** | **14,28,223.92** |

| PROPERTY AND ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|
| Investments | | |
| Fixed Deposits With | | |
| Saraswat Bank, Worli | 4,28,144.00 | |
| Cosmos Co-op. Bank, Dadar | 1,65,000.00 | |
| Janata Sahakari Bank, Dadar | 1,82,542.00 | |
| Jan Kalyan Sah. Bank, Dadar | 75,000.00 | |
| Jan Kalyan Sah. Bank, Shivaji Park | 1,10,000.00 | |
| Jan Kalyan Sah. Bank, Sion | 2,97,749.30 | |
| UCO Bank, Pune | 3,13,747.00 | |
| U.T.I. - C.R.T.S. | 59,000.00 | 16,31,182.30 |
| Interest Receivable | | |
| On Fixed Deposits With | | |
| Jan kalyan Sah. Bank Ltd., Sion | 10,430.00 | |
| UCO Bank, Pune | 38,132.62 | 48,562.62 |
| **T.D.S. Receivable** | | |
| For 1998-1999 | 2,262.00 | |
| For 1999-2000 | 4,968.00 | |
| For 2001-2002 | 2,296.00 | |
| For 2000-2001 | 2,188.00 | |
| For 2002-2003 | 2,002.00 | |
| For 2003-2004 | 696.00 | 14,412.00 |
| **Cash and Bank Balances** | | |
| Cash on Hand with | | |
| Mumbai Office | 4,194.00 | |
| Pune Office | 19,489.50 | 23,683.50 |
| Cash at Bank | | |
| Saraswat Bank, Worli | 2,12,790.84 | |
| UCO Bank, Pune | 76,469.20 | 2,89,260.00 |
| Loan from Shikshan Nidhi | | |
| Preeta Karmarkar | 10,000.00 | |
| Ravindra R. Khambete | 20,000.00 | 30,000.00 |
| Loan from Udyog Pravatan Nidhi | | |
| Mohan Marathe, Sangali | | 10,000.00 |
| Loan from Vaidyakiya Nidhi | | |
| Mukund Marathe, Pune | | 15,000.00 |
| | **TOTAL B/F** | **20,62,100.46** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **TOTAL C/F** | **14,28,223.92** | **TOTAL C/F** | **20,62,100.46** |
| Vinay Khambete Smruti Yojana | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 67,457.00 | | | |
| Add : Interest | 5,397.00 | 72,854.00 | | |
| Anita Khambete Smruti Yojana | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 14,074.00 | | | |
| Add : Interest | 1,126.00 | | | |
| Less : Transfer to I & E A/c | (750.00) | 14,450.00 | | |
| Vastu Prakalpa Nidhi | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 85,000.00 | | | |
| Less : Refunded | (85,000.00) | - | | |
| Ganesh Tantric Shikshan Yojana | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 22,180.00 | | | |
| Add : Interest | 1,774.00 | 23,954.00 | | |
| Hindi Paritoshik Yojana | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,357.00 | | | |
| Add : Interest | 109.00 | 1,466.00 | | |
| Vaidik Shikshan Yojana | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 18,699.00 | | | |
| Add : Interest | 1,496.00 | 20,195.00 | | |
| Shourya Paritoshik Yojana | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 3,146.00 | | | |
| Add : Interest | 252.00 | 3,398.00 | | |
| Pune Dainandini Yojana | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,13,172.00 | | | |
| Add : Page Donations | 15,200.00 | | | |
| Add : Interest | 9,054.00 | 1,37,426.00 | | |
| Building Fund (Pune) | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 41,422.00 | | | |
| Add : Donations | 36,508.00 | | | |
| Add : Interest | 3,314.00 | 81,244.00 | | |
| Current Liabilities & Provisions | | | | |
| Audit Fees | 750.00 | | | |
| Contribution to Charity Comm. | 6,180.00 | 6.930.00 | | |
| Bakshis Anamat | | 2,750.00 | | |
| Income and Expenditure Account | | | | |
| Balance as per Last Balance Sheet | 2,57,750.38 | | | |
| Add : Surplus being excess of Income over Expenditure | 11,459.16 | 2,69,209.54 | | |
| | **TOTAL** | **20,62,100.46** | **TOTAL** | **20,62,100.46** |

Subject to Our Report of Even Date

Note : The Headings as per the prescribed Form which are absent in the above Statement should be read as 'NIL'

**For Marathe Pratishthan**

The above Sheet to the best of our belief contains a true account of the Funds and liabilites and of the property & Assets of the Trust

**For HMA & Associates**
**Charterd Accountant**

Partner
Memebership No.130650
Mumbai,

**Trustee** **Trustee**

# देव, माणूस का देव-माणूस?

**श्री. रविंद्र मराठे, पुणे**

आता आठवले तरी शहारे येतात असाच आहे हा अनुभव, मी २००२ साली पापुआ न्यू गिनी या देशात नोकरी स्वीकारली, खून दंतकथांचे दडपण घेऊनच गेलो होतो. अगदी मेडिकल देताना डॉ. ग्रांट पण म्हणाले, ''का त्या अजून नरभक्षक असलेल्या देशात जातो आहेस? पण सहकाऱ्यांची उत्तम टीम आणि आव्हानात्मक काम असल्याने जाण्याचा निर्णय घेतला.

या देशात 'रास्कल' म्हणजे गुंड सर्वत्र आहेत आणि पेट्रोल पंप, बाजार अशा ठिकाणी ते असतात आणि ५-१० किना (तेथील नाणी) साठी गोळी घालायला मागे-पुढे पाहत नाहीत. रस्त्यावर वाहने थांबवायला परवानगी नाही, नाक्यावर (तिथे राउंड अबाऊट म्हणत) डावी-कडून येणारा आधी जाणार मग तुम्ही कितीही वेगात असलात, तर थांबलंच पाहिजे. गाडी-खाली कुत्रे मेले तर १०० किना दंड आणि बाई असेल तर २० व अशा अनेक टीप व सल्ल्यांचे दडपण असताना, कसे जमणार? अशा मनाच्या अवस्थेत रूजू तर झालो, घर मिळाले ते डाऊन भागात होते आणि ऑफिस ''वायगनी'' भागात, सहकारी खूपच चांगले होते आणि शेजारी पण आपले मराठीच होते. वासू, राजेश अगदी घरच्यासारखे प्रेमाने बडदास्त ठेवत होते. मी त्यांच्याबरोबरच ऑफिसला जात-येत होतो. ४-५ दिवसांत लायसन्स आदी सोपस्कार झाल्यावर मला माझी गाडी मित्सुबिशी लान्सर मिळाली.

पहिला दिवस राजेशबरोबर जा-ये करा आणि मग आपलं आपल्याला जमेल असा विश्वास दिला गेला. संध्याकाळी ऑफिस संपल्यावर मी राजेशच्या मागे निघालो, अंधारून आले होते म्हणून मनात भीतीची पाल चुकचुकली, त्यात वाटेत राजेश सुपरमार्केटमध्ये थोडे थांबू म्हणाल्यावर मला आणखी भीती वाटली होती, पण नवखेपणाची भीड होती म्हणून ठीक आहे म्हणालो.

त्याची खरेदी होईपर्यंत चांगलेच अंधारून आले. जीव मुठीत घेऊन त्याच्यामागे मी गाडी चालवत होतो आणि ज्याची भीती होती तेच झाले, अचानक वादळी पाऊस सुरू झाला. साधा-सुधा नाही एकदम ट्रोपिकल. मला राजेश दिसेना. एका उड्डाणपुलावरून बहुधा तो पुढे गेला आणि मी खालच्या रस्त्याला लागलो. रस्ता डावीकडे जाऊ लागल्यावर मला शंका आली की, चुकलो आता आपण. पावसामुळे आतून काचेवर वाफ जमली होती. खिडकी उघडायची सोय नव्हती.

गाडी नवीन असल्याने वायपर कसे चालू करायचे सुचेना, पण रस्ता चुकला हे समजल्याने पहिल्या संधीला उलट फिरलो आणि हळूहळू गाडी चालवत राहिलो. नशीब पावसामुळे रहदारी कमी झाली होती. शेवटी एक पेट्रोल पंप दिसला, तिथे घाबरत घाबरत गाडी नेली आणि आतच बसून विचार करू लागलो तर भीती वाढतच गेली. माझ्याकडे घराचा पत्ता नव्हता की फोन नव्हता. दोन-चार वेळा गेल्याने रस्ता साधारण लक्षात होता. घर डाऊन टाऊनमध्ये आहे, एवढं माहीत होतं. काही वेळाने मी धीर करून काच उघडली तर एकदम धक्काच बसला. मी माझ्या ऑफिससमोरच्या पेट्रोलपंपावर उभा होतो. खाली उतरून तिथल्या लोकांना माझे ऑफिस समोर आहे आणि रात्र झाल्यामुळे मी एकटा घरी जाऊ शकत नाही, मला मदत करा असे सांगू लागलो, किमान मला ऑफिसमध्ये सोडा असे विनवू लागलो. (आता ऑफिसमध्ये कोण असणार हा विचार थरकाप निर्माण करत होताच.) पंपावर दोनच माणसं होत. एक भगवा टीशर्ट घातलेला, डोक्याचा गोटा केलेला, बारीक कोरलेल्या मिशा आणि तरतरीत नाकाचा तर दुसरा पोरगेला, हे रास्कल असतील तर? ऑफिसची गाडी आणि माझा जीव दोन्ही जाणार असे वाटू लागले. खिशात पैसे पण मोजकेच होते.

ती माणसे पण माझ्याकडे लक्ष देत नव्हती. मी रास्कलसारखा नक्कीच दिसत नव्हतो. मी सारखा देवाचा धावा मनात करीत होतो. गजानन महाराजांचे अगदी व्याकुळ होऊन स्मरण करत होतो, आणि काय झाले माहीत नाही, दोघातला थोरला देव माणूस माझ्याजवळ आला. त्याला पुन्हा सगळे सांगितले, माझा पांढरा फटक चेहरा पाहून त्याला पण दया आली असावी. तो पत्ता विचारत होता, किमान जवळची एखादी जागा सांग असं म्हणत होता, पण मला काहीच सांगता येत नव्हते. शेवटी देवाचे नाव घेऊन त्याला गाडीची किल्ली दिली. त्याच्याशेजारी बसलो. कसे जायचे ते मी सांगतो म्हणालो आणि दार लावले. समोर रस्त्याचे काम चालू असल्याने जरा लांबून जावे लागत होते. गाडी फिरवून आम्ही पंपासमोरून जात होतो, तर त्याचा सहकारी त्याला जोरजोरात हाका मारत होता. मी त्याला थांबू नको. मला सोड आणि मग जा असे विनवू लागलो. अखेर तो राजी झाला. आणि आम्ही निघालो. त्याने सराईतपणे गाडी चालवत मला आमच्या घराजवळ आणले. तिथे परत एक फाटा होता डावीकडे का उजवीकडे मला आठवेना. माझ्या सारथ्याने अगदी आपल्यासारखा डोक्याला हात लावला, अखेर डावा रस्ता पकडून पुढे गेलो आणि थोड्याच वेळात घर दिसले. शेजारी मला शोधण्यासाठी आधीच बाहेर पडले होते, मोबईल वगैरे काही नव्हते. आता या उपकार कर्त्याला परत कसे सोडायचे? हा जटील प्रश्न उभा राहिला. अखेर मी एका ऑस्ट्रेलियन शेजाऱ्याला त्याला सोडण्यासाठी विनंती केली. त्याला काही केल्या काय चालले आहे ते कळत नव्हते. तो १०-१५ मिनिटे लागतील म्हणाला. मित्राला तर घाई होती, कारण पंप सोडून तो आला होता. मी खरंच रडकुंडीला आलो होतो. त्याला माझ्याजवळ जे होते ते पैसे देऊ लागलो तर तो नको म्हणाला. लवकर सोडा नाही तर तुम्ही परत चला. आता पाऊस थांबला आहे असं म्हणू लागला.

अखेर मला शोधायला गेलेले शेजारी आले आणि माझा जीव भांड्यात पडला. त्यांनी त्याला

सोडले आणि बक्षीसपण दिले. आल्यावर राजेशला फार अपराधी वाटायला लागले आणि बाकी सगळे त्याच्यावर तुटून पडले. मी त्यांना झाले ते बस झाले आता देवाचे नाव घेऊन मला घरी जाऊ द्या. तुमच्या सगळ्यांचे मन:पूर्वक आभार आणि माझ्यामुळे झालेल्या त्रासासाठी क्षमस्व असं म्हणत पळ काढला. दुसऱ्यादिवशी आभार मानायला पंपावर गेलो तर तो नव्हता, जितका काळ मी त्या देशात होतो तितका काळ मी त्याला पंपावर शोधत असे, पण तो पुन्हा कधीच दिसला नाही, कोण होता तो देव, माणूस का देवमाणूस? चुकलेल्या जागेवरून जाताना मात्र रोज तो प्रसंग आठवून अंगावर काटा यायचा.

**- रविंद्र मराठे, पुणे**

**Dear friends from our Pariwar,**

I am going to address you in English as I feel many of you and the younger generation in particular, may not be conversant with Marathi.

I am glad to see your enthusiastic response to this August function. Congratulations.

You all must be well informed about our Prathisthan. However for the benefit of, may be, a few of you, I am narrating in brief, how our Prathisthan came into being.

A few decades ago, a few enthusiastic Kapigotri Marathes like Shri. Wamanrao who has now setteled in Pune, late Shri, Suresh-bhau, Late Shri. Shankar Hari and a few others came together with an idea of bringing together persons from the clan and Marathe Pratisthan was formed in the year 1981, mainly to compile the Kulavrittant and Vanshavali of all Kapigotri Marathes. As a result of thid effort and the recent efforts of Shri. Sitaram Khambete, who is present here, we have already been able to place "Kanada Marathe" vanshavali in your hands today. We need your support to help us modify and update the information published there by remaining I touch with us through e-mail.

In the later part of 1981, an in-house publication titled 'Mukhapatra' was launched. It used to be an eight page quarterlu publication, handwritten by our enthusiatic founders. By 1987 the name of the publication was changed to 'Hitguj' (meaning 'cordial dialogue') amd its publication commenced in printed form, thanks to the help extended by Late Shri. Sureshbhau.

Initially, registration fee for the Members was Life Membership of Rs.100. In addition to this Life Membership fee for Hitguj was Rs. 200.

Our Pratisthan thus started on a very modest scale. During the past three decades, our Pratisthan has grown but the growt is very slow. This is becasue we have been living on the interest we get on these one time life membership fees and donations from members. Our Pratisthan has no other means for generation of resources.

In fact a couple of years back, we faced such a situation that we could not meet even the expenses on Hitguj and therefore had to either decide to stop publication or raise the membership fee to Rs.1000 and approach the members for additional contribution of Rs.1,000 towards Hitguj Nidhi. We have been receiving good response from the Members and we have been able to continue the publication. I would humbly request all of you to pay this additional contribution. The current membership of Hitguj is over 1200,spread all over India and abroad. I appeal all of you to become members of Hitguj and get linked with Marathe Pratisthan, Mumbai. Your personal and business Advertisement for Hitguj are most welcome.

You all know that if an organization has to flourish, in addition to enthusiastic members, it needs financial support. As I said earlier, our Pratisthan has been living on interest on deposits and donations. I feel, this cannot take us a long way. We have to think about projects that can be sources of permanent generations of funds.

Though we have highly motivated members, their hands get tied for want of funds. When a needy member approaches us for help for treatment of serious illness, we are only able to meet his need partially, even in the form of a loan.

Our Members from Pune have thought of a project for Construction of a Hall which can be let out for meeting and functioms like weddings. Funding from the project will be mainly from donations, interest bearing deposits from Members and loans from financinh institutions. The project is in the stage of planning and they are in the process of indetifying a suitable small plot of land.

I am glad to know that you have launched "Marathe Parivar-Karnatak" with a view to looking after the needs and aspirations of Kanada Marathes.You are welcome to communicate with us for any guidance and contact information of other Marathe Parivar Members of any place, through email to **maratheparivar@yahoo.co.in** and share useful information of mutual interest.

I would appeal to the members present here to conceive some projects which can be sources of permanent generation of funds for our Pratisthan.

I than you all and particularly those of you who have put in tremendous efforts to make this August funtion a great success.

(Inaugural Address By Shri Ramkant M Vidwans, Vice Chairman - Marathe Pratisthan on the occasion of a gathering of Marath Parivar-karnatak at Maharashtra Mandal, Bangaluru in 1st May 2010)

**प्रेषक : रमाकांत विद्वांस (पृ.६२३)**

# पारध

**कै. विनायक दत्तात्रेय मराठे**

काही वर्षांपूर्वी गावाला गेलो होतो. नवलाईचे आठ-पंधरा दिवस संपल्यावर दिवस कंटाळवाणे वाटू लागले होते. संध्याकाळी तात्यांकडे गेलो व म्हटले, ''तात्या कोंबडीचा रस्सा हाणायला कधी बोलावता? जेवणाआधी जरा दुसरा बेत पण होईल आणि गप्पागोष्टींत एक रात्र मस्त जाईल.'' ''असा म्हनतोस? मग कोंबडीच कशाला? दोन दिवसांवर त्रयोदशी, चतुर्दशी येतेय. काळोख्या रात्री शिकारीसच जाऊया. बघू काय मिळता. दुसऱ्या रात्री मेजवानी, एकच का तुझी दोन रात्री मजेत जायची व्यवस्ता करतो.'' तात्या बोलले.

आणि मग आमचा एक रात्री पारधीस जायचा बेत नक्की झाला. तात्यांना आयत्या वेळी काम निघाले म्हणून ते येणार नव्हते. तात्यांचा बाळू, सर्चलाईट टाकायला अन्या, रस्त्याच्या कामावरचा ट्रक व त्याचा ड्रायव्हर, मी आणि माझा भाऊ असे ट्रकातून रात्री साडेनऊला निघालो. तात्यांच्या तालमीत बाळू चांगलाच नेमबाज झाला होता. त्याची डबल बरल व आणखी एकखणीची अशा दोन बंदूका सावरत आम्ही गावाबाहेर पडलो व सडा पार करून जंगलाच्या दिशेने आमचा ट्रक चालू लागला. अन्या दोन बाजूला सर्चलाईट टाकत इशारे करीत होता व आम्ही काय दिसते का पाहायचा प्रयत्न करीत होतो. एवढ्यात एक गोजिरवाणं भेकरे पुढ्यात कोसळणार या कल्पनेने माझा जीव जरासा गलबलला. पण चाप ओढण्या-पूर्वीच ते टुणकन कुठे पळाले कोणाला समजलेच नाही. बाळूने एक अस्सल शिवी हासडली. सर्च लाईट पुन्हा फिरू लागला. तेवढ्यात जरा दूरवर ते भेकरे पुन्हा उभे राहिले. बाळूने बार काढला. एका झटक्यात लाईट बाळूच्या हातात देऊन अन्याने खाली उडी मारली व तो धावू लागला. इकडे-तिकडे खूप धुंडाळून सुद्धा काही मागमूस लागला नाही की रक्ताचा एक थेंब दिसला नाही.

''बाळू, चकवा रे चकवा! आजचा लक्षान काय बरा दिसत नाय. डोळ्यासंबूर ठोकलेला सावज ग्येलां खंय?''

''तूं चूप रे भ××× सुरुवातीसच शुब बोल रे नाऱ्या नको.'

जरा पुढे गेल्यावर एकदम चार ससे पुढ्यात ठाकले. बाळूने संधी वाया घालवली नाही. एका सशाची लोधय पुढ्यांत येऊन पडली. अन्याने झटक्यात खाली उतरून शेपटी धरून ससा उचलला व ट्रकात घेतला.

सगळ्यांनाच जरा हुरूप आला व आता डुक्कर किंवा हरण घेतल्याशिवाय जायचे नाही अशा निर्धाराने आम्ही पुढे निघालो.

जरा पुढे सरकलो तेवढ्यात पुढच्या वाकणातून दिवे दिसायला लागले, ''हा कोण आमच्या शेरावर आणखी?'' असे म्हणून बाळू करवादला. इतक्यात एक भरधाव जीप आमच्या पुढ्यात येऊन थांबली. चार-पाच ड्रेसातले लोक पुढे ठाकले. कस्टम एक्साईजवाले! खबरीच्या तपासांत!

''काय रे? कोण तुम्ही? कुठे निघालांत? शिकारीचे लायसन हाय काय?'' लागोपाठ दरडावणीच्या सुरात फैरी झडल्या. आमची पांचावर धारण बसली. ऐन थंडीत घाम फुटला. पुढे काय वाढले आहे कळेना.

''बं बं बंदुकीचं लायसन्स आहे साहेब.'' बाळू पण घाबरला होता.

एवढ्यांत ''आमी शिकारीला नाय आलेले सायेब. आमची रेडी चुकली हा तिका शोदूक निगालेले.'' अन्यानं सर्चलाईट सावरला व आरोळी दिली, ''ये ऽऽ तानी ये ऽऽ हूं!''

''चूप रे, काय मस्करी लावलीये?''

''सायेब, मस्करी नाय. सांजची सगली ढोरवां परतली. बगतय तर तानी नाय. गुराक्यांक हटकला. तां म्हनतां मागे ऱ्हवली. रानातल्याच्या ढोरांत तिका बगीतलीच नाय. मग्ये काय, जेवना करून आमी निगालेले. वागा लांडग्यान धरूच्या आंत मिळोक हवी. ये ऽ ऽ तानी ये ऽऽ''

''मग या बंदुका कशाला?''

''सायेब, येवडा रान धुंडूचा. न्येम काय? इलो वाग डुकर अंगावर तर असूची म्हटली. साएब, लायसेण हाय आमका.''

''वटवट बंद कर रे. ए बाबानो आमच्या कामांत मध्ये येऊ नका. सरळ मागे फिरा नि गुमान जाऊन झोपा. कां ठेऊ बंद करून रातभर? सोमजी एकदा ट्रकांत चढून बघ काय आहे?''

पट्टेवाला ट्रकावर चढून झाडा घेऊन खाली उतरला. आम्हाला वाटले सुटलो एकदाचे. आता निमुटपणे परत निघायचे.

पण एव्हढ्यावर थांबला तर तो अन्या कसला? अन्या म्हणजे एक वल्ली! हजरजबाबी, मिस्किल, वात्रट!

''साएब, असा कसा होयत हो? आमी काय तुमच्या स्मगलिंगमदे येत नाय. तुमी तुमचा स्मगलिंग करा, आमी आमचा रेडकू शोदतो. तुमी खयची ती एक वाट धरा. आमी दुसरी वाट धरतो. तुमचा स्मगलिंग आमका मिळाला तर आमी तुमाक द्येव; आमचा रेडकू तुमाक गवसला तर तुमी आमका द्येवा.''

''आम्ही स्मगलिंग करायला चाललो काय रे? आता निघता की नाय?''

''सायेब, तुमी स्मगलिंग पकडायला निगालेले ह्यां आमी तवांच हेरलां, पण सायेब, असा नका करू हो. आमचा रेडकू ग्येला तर केवढी नुसकानी, म्हस रेडकू नाय बगून दुदावरची उडाली तर तशी नुकसानी, रेडकू गेलां तर तशी नुकसानी, म्हनून म्हणतो, साएब असां नका करू. आमासनी रेडकू शोदूक द्या. आमी आज जावोन उद्यांक इलो तर रेडकाचो सांगाडो नाय नजरेक पडणार. तुमचे स्मगलिंगवाले आमका जरा जरी पायरवले तरी आमी थंयच त्यांचे टायर फोडू. आमच्या बाळूचो नेम काय हा बगा, बरीक आमच्या रेडकावर तुमी नजर लाऊन ऱ्हावा.''

''सोमजी, आहे रे कोण हा? चल उचल याला, मेंटलमध्येच नेऊन घालूया.''

''साएब आमी कोणी फालतू नाय. आमी या गांवचेच हांव. हा तात्याशेटचा मुलगा. तात्याशेट

म्हणजे थेट यशवंतरावापर्यंत वट हा. दोन-तीन महन्यांत एकदा तरी त्यांच्या पंक्तीक असतात. अनी ह्ये मुंबईत कंपणीत मोठ्या हुद्यावर हात. अनी ह्ये त्यांचे धाकटे भाव. गावात जाऊन इचारून या. कोन वाईट बोलणार नाय. गोवा सोडवायच्या आदी क्येवडी वट होती तात्यांची बारडरवर. तुमच्याच लोकांना इचारा.''

आम्हाला हसू दाबताना नाकी नऊ आले! पण अन्याचं काही संपेना.''

आता साहेब जीपमधून उतरून खाली आले. ''बाबा, आता तुझ्या पाया पडतो आम्ही पण तुझं चऱ्हाट थांबव. उद्या सकाळी तुझी रेडी आणि बरोबर म्हैससुद्धा आम्ही तुझ्या दारात आणून बांधतो. पण तू आता आमच्यावर मेहेरबानी कर आणि नीघ.''

आम्हीही आता जास्त काही खरं नाही हे समजून ड्रायव्हरला ट्रक चालू करायला सांगितलं. जीप आपल्या वाटेने चालू पडली व आम्ही गाव उतरू लागलो. इतका वेळ दाबून धरलेले हसू सर्वांच्याच तोंडून एकदम बाहेर पडलं. एकेकजण जीव जाईतो हसू लागला.

''अतां हसतांव, पन पयल्यांन कशी जाली व्हती एकेकाची? मी व्हतो म्हनूनच. नायतर बसले असतांव रातभर जाऊन.''

खरंच होतं ते! आमची उत्तरं आणि विसंगती ऐकून नक्कीच आम्हाला रात्रभर बसायला लागलं असतं.

''अरे अन्या, पण सशाचं काय केलंस? कां दिलास त्या सोम्याला?''

''ससो हा शाबूत. त्या अबकाऱ्यांची तोंडां बगितल्या बरोबरच मी पयलो आदी ससो टायरच्या मदोमद घातलो. त्यावर गोणपाट हांतरला नी वर ह्यो कॅन लावलो. त्येंच्या नजरेस पडतो तर ऱ्हवता व्हय? आता खाशाला मिटक्या मारीत!''

अन्याने खरोखरच बाजी मारली होती.

''अन्या, आज तुझ्यामुळेच सगळे वाचला. अतां तू काय म्हनशा तां आमका परमान.''

''बरां तर! आदि पयलो अतां ससो सोलूक घ्येवचो.''

**- (कै.) विनायक दत्तात्रेय मराठे**

मृगधारा, ४०८ यशवंत नगर
तळेगाव दाभाडे, जि. पुणे - ४१० ५०७

## * प्रवासातील काळजी *

ट्रीपला, प्रवासाला जाताना तिकिटे बरोबर घेण्यास विसरणे, घराचा नळ, गॅस बंद न करणे आदी गोष्टी आपण ऐकतो, त्यावर उपाय म्हणून प्रवासाच्या वेळी पाळायची 'चेकलिस्ट' खाली दिली आहे.

*१. तिकिटे बरोबर घेणे. २. पैसे वेगवेगळ्या ठिकाणी ठेवणे. ३. लगेज चेन ४. ज्येष्ठ नागरिकाचे कार्ड ५. मोबाईल व चार्जर ६. एटीएम कार्ड ७. महत्त्वाच्या टेलिफोनची यादी ८. औषधे ९. दाढीचे, वेणीफणीचे सामान १०. टुथब्रश, पेस्ट ११. सुईदोरा, बटणे १२. कपडे वाळविण्याकरितां दोरी १३. गॅस, इलेक्ट्रिसिटी, पाण्याचा नळ बंद करणे. १४. पेपरवाला, दूधवाला, मोलकरीण यांना सांगणे. १५. कोरडे खाद्यपदार्थ, पाण्याची बाटली, टॉर्च १६. शेजारी किल्ल्या ठेवणे. १७. पोथी, जपमाळ आदी.*

अशी काळजी घेतली तर प्रवास का नाही सुखाचा होणार.

**- प्रेषक : ग. भा. मराठे (पृ. ४२७)**

## नांदा सौख्यभरे

चि.सौ.कां. तेजस्विनी (कै. सौ. मृणालिनी व श्री. माधव वासुदेव मराठे यांची ज्येष्ठ कन्या) हिचा शुभविवाह चि. महेश (सौ. शोभा व श्री. मनोहर कृष्णाजी ओक, गुहागर यांचे सुपुत्र) यांचेबरोबर वैशाख शुद्ध १२, शके १९३२, मंगळवार दिनांक २५ मे, २०१०ला दुपारी १२वा. ४८मिनिटांच्या शुभमुहूर्तावर दत्त मंगल कार्यालय, रत्नागिरी येथे थाटामाटात संपन्न झाला.

नवविवाहितांना मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक शुभेच्छा!




## या चिमुरडीची कविता

*मालीडाडा, मालीडाडा तुम्ही क्क्य करतयाय?*
*मी ना का म करतो.*
*कसले का म?*
*फुले काढायचे.*
*कशाला?*
*देवाला.*
*तुला आवडतात फुले?*
*हो. वाज़ घ्यायला आ नी फूलदाणीत ठेवयला.*
*हा घ्या वा स!*
*का य आ हे?*
*टूल स*
*ही स्वेन फ्लूला उपयोगी आहे.*
*मज़े बाबा रोज टिचा वास देतात.*
*हे कसले झाड़?*
*कडुनिंब.*
*मी पान रोज खाते.*
*त्यामुले पोत चांगले रहेते.*
*तुम्ही रोज बाग ज़ड़ता?*
*हो.*
*त्यामुले आरोग्य चांगले राहते, शूधा हवा मिलते.*
*अन्य आपले आरोग्य चांगले रहते.*
*बा य बाय मालीडाडा.*

If you are unable to read the message on top. read the same message in English -
*malidada, malidada tuhi kky kartayaay?*
*mi na ka m karto.*
*Kasle ka m?*
*Phule kadhayche.*
*Kashala?*
*dewala.*
*Tula awadtat phule?*
*ho. Was ghyayla a ni phuldanit thewayla.*
*Ha ghya wa s!*
*Kay y a he?*
*Tul s.*
*hi, swain flula upyogi ahe.*
*maze baba rojach ticha waas detat.*
*he kasle jhad?*
*kadunimb*
*mi pan roj khate.*
*tyamule pot changle rahate, shudha hava milte.*
*ani aaple aarogy changle rahate.*
*ba y ba y malidada.*

**- तेजश्री मराठे, (पृ.५०३)**

पुणे



# प्रत्येकाचं स्वप्न[redacted]



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

**निर्माण ग्रुप**
**ऑफ कंपनीज्**
**बिल्डर अँड डेव्हलपर्स**

## आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

[redacted]थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

[redacted]तील प्रकल्प स्थाने : नेरळ | [redacted]